रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १४८
www.ramprahar.com
◆ सोमवार, १५ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## नितीन नबीन भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी



**नवी दिल्ली :** बिहार सरकारमधील रस्ते विकासमंत्री नितीन नबीन यांची भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते जे.पी. नड्डा यांच्याकडून सूत्रे हाती घेतील. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने नबीन यांच्या संघटनात्मक अनुभवाला, तळागाळापर्यंत असलेल्या दांडग्या जनसंपर्काला आणि प्रशासकीय कौशल्य आणि क्षमतांना प्राधान्य देत हा निर्णय घेतला आहे. बिहारमधून पाचव्यांदा आमदार झालेले नबीन या वेळी नितीश कुमार यांच्या सरकारमध्ये रस्ते विकासमंत्री म्हणून कार्यरत आहेत. सरकार आणि संघटना दोन्हीमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नबीन यांचे अभिनंदन केले असून त्यांची ऊर्जा आणि वचनबद्धता येणाऱ्या काळात पक्षासाठी लाभदायी ठरेल. पक्ष त्यांच्या नेतृत्वात आणखी मजबूत होईल, असा विश्वास पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला आहे.

अंतरंग
लोक अदालतीत १७,९२० प्रकरणांचा निपटारा/२
स्ट्राँगरूममध्ये उंदराची करामत; प्रशासनाची धावाधाव!/५
सिडको ओपन आंतरराष्ट्रीय गोल्फ स्पर्धा रंगणार/८

# महाराष्ट्राच्या विकासाची गाडी थांबणार नाही!

## मुख्यमंत्र्यांची ग्वाही; विविध मुद्द्यांवर मांडली भूमिका

**नागपूर : प्रतिनिधी**

निवडणुका झाल्या की योजना बंद केल्या जातील, असे अनेकजण सांगत आहेत, परंतु लाडकी बहीण असो वा शेतकऱ्यांना वीज बिलमाफी पुढची पाच वर्षे एकही योजना बंद होणार नाही. रचनात्मक कार्य आणि सर्वांच्या सहकार्याने महाराष्ट्र २०३५च्या अमृतमहोत्सवी वर्षाकडे वेगाने वाटचाल करेल. महाराष्ट्राच्या विकासाची गाडी थांबणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १४) विधानसभेत दिली.



अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुती विकासाचा अजेंडा घेऊन जनतेसमोर गेली. आम्ही कोणावरही टीका केली नाही, कारण २०३५ चा अमृतमहोत्सवी महाराष्ट्र घडवण्यासाठी आपल्याला वाटचाल करायची आहे. सभागृहातील दोन्ही बाजुंच्या नेत्यांना माझी विनंती आहे, की अमृत महोत्सवी वर्षाकडे जाताना रचनात्मक प्रकारच्या कार्यातून महाराष्ट्राला खूप वेगाने पुढे नेऊ शकतो. त्यांनी एक हिंदी कविता उद्धृत करत आपला निर्धार व्यक्त केला. ते म्हटले, अब आगे बढ़ चुका हूँ मै, पिता है जितना जहर, पी चुका हूँ मै. अब पग नही रुकने वाले, चल चुका हूँ मै. जितना पढना था तुमको, पढ चुका हूँ मै. अब और आगे बढ चुका हूँ मै!

राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले, मी असे म्हणणार नाही आपल्या तिजोरीत खूप पैसे आहेत, पण मी एक निश्चितपणे सांगू शकतो की, देशाच्या मोठ्या राज्यांच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला, तर आजही सर्व निकषांवर पात्र होणारी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे आपली अर्थव्यवस्था कुठेही दिवाळखोरीकडे चाललेली नाही.

गुंतवणुकीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र गुंतवणुकीत खूप पुढे चाललेला आहे. दावोसव्यतिरिक्त सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या अंतर्गत १३ लाख ७५ हजार ७२९ कोटी झालेली आहे. सात लाख ११ हजार २५९ रोजगार निर्माण होणार आहेत. थेट परकीय गुंतवणुकीचा विचार केल्यास त्यातही महाराष्ट्र नंबर १ आहे. देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या ३१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आलेली आहे.

शेतकऱ्यांच्या मदतीबाबत विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, शेतकऱ्यांना मदत जाहीर केली, पण पैसे आले नाहीत, असा आरोप झाला. आम्ही जाहीर केलेल्या ३२ हजार कोटींच्या पॅकेजमधील १० हजार कोटी हे पायाभूत सुविधांसाठी होते. ते नरेगामधून देणार होतो, उर्वरित मदत ही थेट होती. त्यात तीन हेक्टरची मर्यादित ठेवली होती. एनडीआरफच्या मदतीव्यतिरिक्त रब्बीच्या हंगामाकरिता १० हजार रुपये हेक्टरी अतिरिक्त मदतीची घोषणा केली होती. पशूहानीसाठी सर्व पैसे दिले आहेत. शेत जमीनीचे नुकसान आणि बी-बियाणांकरिता १५ हजार सात कोटी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष खात्यात दिले आहे. पिकांचे पैसे ९२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात गेले आहेत. रब्बीसाठी १० हजार रुपये हेक्टरी मदत ९१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा शब्द दिलेला आहे. याबाबत समिती तयार केलेली आहे. २०१७ आणि २०१९मध्ये कर्जमाफी केली तरीदेखील शेतकरी कर्जमाफी मागतो आहे, याचा अर्थ नियोजनात अडचणी आहेत. त्यावर टप्प्याटप्प्याने उपाययोजना शोधण्यासाठी ही समिती काम करेल. १ जुलैपर्यंत कर्जमाफीबाबत घोषणा करू, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### चंद्र-सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राचीच राहणार!

महाराष्ट्राच्या सामर्थ्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र शक्तीशाली राज्य आहे, त्यामुळे कुठलाही संभ्रम ठेवण्याची गरज नाही. कोणीही मनात शंका घेऊ नये, की मुंबई महाराष्ट्रापासून तोडली जाईल. निवडणुका जवळ आल्या की अशा चर्चा सुरू होतात, पण मी आश्वस्त करतो, जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत, तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राचीच राहील. छत्रपती शिवरायांच्या तत्वाने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानानेच महाराष्ट्र चालत राहील. त्यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचे कौतुक करत सांगितले की, सीबीएसईच्या पुस्तकात याआधी छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासावर एक परिच्छेद होता, तर मुघलांचा इतिहास १७ पानांचा होता. आता नवीन पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहास २१ पानांचा घेतला आहे. त्यामुळे केंद्र सरकारचे आभार, असेही ते म्हणाले.

# पनवेल महापालिका क्षेत्रात ३०८ कोटींच्या विकासकामांचे आज भूमिपूजन व लोकार्पण

### भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये सुमारे ३०८ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी (दि. १५) सकाळी ९ वाजल्यापासून विविध ठिकाणी करण्यात येणार आहे. यानंतर पनवेल येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात दुपारी १ वाजता प्रमुख कार्यक्रम होणार आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोहयो, फलोत्पादन, खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, तर सन्माननीय उपस्थिती खासदार सर्वश्री सुनील तटकरे, श्रीरंग बारणे, धैर्यशील पाटील, आमदार सर्वश्री रविशेठ पाटील, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांची लाभणार आहे. त्याचप्रमाणे भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या वेळी विविध विकासकामांचे लोकार्पण होणार आहे. यामध्ये पिसार्वे तलाव पुर्नज्जीवित व सुशोभीकरण, कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पूल, प्रभाग समिती अ खारघर येथील प्रभाग कार्यालय, खारघर येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रभाग समिती ब कळंबोली नोडमधील आयडीबीआय बँक सेक्टर ८ ते सन शाईन सोसायटीपर्यंत काँक्रीटीकरण झालेले रस्ते, प्रभाग समिती ब कळंबोलीमधील सेक्टर ८ई मधील प्रभाग कार्यालय, प्रभाग समिती क मधील कामोठे सेक्टर ११ येथे प्रभाग कार्यालय, लोकनेते दि.बा. पाटील यांच्याबद्दल माहिती दर्शविणारे म्युरल व सुशोभित कक्ष (स्मारक) यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

याचबरोबर विविध विकासकामांचे भूमिपूजन होईल. यामध्ये नवीन पनवेल पश्चिम सेक्टर १८ येथील माता व बालसंगोपन केंद्र, प्रधानमंत्री आवास योजना व मुख्यमंत्री आवास योजनेंतर्गत पनवेल बसस्थानकामागे कुष्ठरोग पीडितांसाठी व खुल्या विक्रीसाठी प्रस्तावित गृहप्रकल्पांचे बांधकाम, प्रभाग समिती क मधील लायन्स गार्डन ते पीडब्ल्यूडी ऑफिस ते जुने कोर्ट ते बंदर नाकापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि प्रभाग समिती ड मधील व्यावसायिक दुकाने बहुमजली वाहनतळ बांधणे कामाच्या भूमिपूजनाचा समावेश आहे.

पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या या विकासकामांमुळे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होऊन जीवनमान उंचावण्यासाठी मदत होणार आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर आणि सहकारी कार्यरत आहेत.

## निवडक

### कोलकातामधील गोंधळप्रकरणी आयोजकाला पोलीस कोठडी

**कोलकाता :** अर्जेंटिनाचा फुटबॉल आयकॉन लिओनेल मेस्सीच्या बहुचर्चित गोट इंडिया टुर २०२५चे मुख्य आयोजक शताद्रू दत्त यांना न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. कोलकात्यातील साल्ट लेक स्टेडियम कार्यक्रमात शनिवारी मोठ्या प्रमाणावर गोंधळ आणि तोडफोड झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

### ऑस्ट्रेलियात उत्सवादरम्यान गोळीबार, १० जणांचा मृत्यू

**सिडनी :** ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे बोंडी बीचवर ज्यू नागरिक हनुक्का उत्सव साजरा करत असताना दोन हल्लेखोरांनी अंदाधुंद गोळीबार केला. यात १० नागरिकांचा मृत्यू झाला आहे. एका माणसाने धाडस करून दोन हल्लेखोरांपैकी एकाला निःशस्त्र केले. घटनेत एका हल्लेखोराचा मृत्यू झाला असून दुसऱ्याला अटक करण्यात आली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या हल्ल्याचा निषेध करून भारत देश ऑस्ट्रेलियासोबत असल्याचे ट्वीट करीत म्हटले आहे.

## पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

### आमदार प्रशांत ठाकूर यांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील कच्छ युवक संघाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या रक्तदान चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा रविवारी (दि. १४) पार पडला. संजय जैन मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हे १०२वे रक्तदान शिबिर लोकसहभागातून यशस्वी झाले.

विशेष म्हणजे या शिबिरात आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून रक्तदान केले आणि इतरांनाही आवाहन केले. (पान २ वर..)

# भाजपमध्ये जोरदार इनकमिंग

### शेकाप, शिवसेना पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

येऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उरण विधानसभा मतदारसंघातील गव्हाण जिल्हा परिषद तसेच पोयंजे पंचायत समिती गणातील शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेतील पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व असंख्य कार्यकर्त्यांनी रविवारी (दि. १४) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी व इतर मान्यवरांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.




उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, गेल्या काही महिन्यांपासून भारतीय जनता पक्षात मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश होत आहेत. पनवेल आणि उरण मतदारसंघांमध्ये दोन्ही आमदार विकासाच्या दृष्टीने भरीव काम करत आहेत. त्यामुळे या परिसरात भाजप हा प्रमुख पक्ष बनला आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही. महायुती म्हणून आपण एकत्रितपणे निवडणुकीला सामोरे जाऊ तसेच नव्याने आलेल्या कार्यकर्त्यांना मान-सन्मान दिला जाईल.

आमदार महेश बालदी यांनी मनोगतात उलवे शहराच्या भविष्यासंदर्भात भूमिका मांडली. उलवे हे २१व्या शतकातील महाराष्ट्रातील महत्त्वाचे शहर आहे. येथे जर कुणी दहशत पसरवण्याचा प्रयत्न करत असेल, तर ती दहशत संपवण्याचे काम आपल्याला करायचे आहे. कमिशनखोरी व पाकीटमार प्रवृत्तीला येथे थारा दिला जाणार नाही. हे शहर भयमुक्त, सुरक्षित आणि विकासाभिमुख करण्यासाठी नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. (पान २ वर..)

# क्रिकेटवेड्या मुंबईत फुटबॉलपटू मेस्सीचा जलवा

## मान्यवरांची उपस्थिती; प्रोजेक्ट महादेवा उपक्रमाचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू ज्याचे चाहते भारतासह संपूर्ण जगभरात परसले आहेत असा अर्जेंटिनाचा स्टार खेळाडू लिओनेल मेस्सी रविवारी (दि. १४) मुंबईत दाखल झाला. मेस्सीला पाहण्यासाठी चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी प्रोजक्ट महादेवा या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

एरव्ही क्रिकेटप्रेमींच्या रंगात रंगणारे वानखेडे स्टेडियम रविवारी पूर्णपणे फुटबॉलमय झालेले पहायला मिळाले. चर्चगेट स्टेशनहून वानखेडेकडे जाणाऱ्या गल्लीत तर एक वेगळाच उत्साह ओसंडून वाहत होता. चाहत्यांनी खचाखच भरलेल्या स्टेडियममधील या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यासह बॉलीवूड स्टार अजय देवगण, टायगर श्रॉफ आणि भारताचा स्टार फुटबॉलर सुनील छेत्री यांचीही विशेष उपस्थिती होती. या भेटीदरम्यान सचिनने आपली १० नंबरची भारतीय संघाची जर्सी मेस्सीला भेट म्हणून दिली, तर मेस्सीनेही सचिनला फुटबॉल गिफ्ट केला.






या निमित्ताने राज्य सरकारच्या क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन, सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास करण्याच्या उद्देशाने प्रोजक्ट महादेवा या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या २० मुले आणि २० मुलींना वानखेडे स्टेडियमवर आमंत्रित करण्यात आले व त्यांना थेट मेस्सीकडून फुटबॉलचे धडे गिरवण्याची संधी देण्यात आली.

# नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले!

### अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीला मुंबईत

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूरच्या गुलाबी थंडीत गेल्या एक आठवड्यापासून सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाचे सूप अखेर वाजले. पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी रोजी मुंबई विधान भवन येथे होणार आहे.

हिवाळी अधिवेशनात ७२ तास ३५ मिनिटे कामकाज झाले. अन्य कारणांमुळे १० मिनिटे वाया गेली. प्रतिदिन सरासरी कामकाज १० तास २२ मिनिटे होते. या अधिवेशनात एकूण सात हजार २८६ तारांकित प्रश्न प्राप्त झाले. त्यापैकी २१५ प्रश्न स्वीकारण्यात आले, तर उत्तरित झालेले प्रश्न २७ होते. विधानसभेत एकूण १८ शासकीय विधेयक मांडण्यात आली. त्यातील १६ विधेयक संमत करण्यात आली.

विधान परिषदेत चार विधेयक संमत करण्यात आली. अधिवेशनात एक हजार ८६७ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या. त्यातील २९९ लक्षवेधी स्वीकारण्यात आल्या, तर ७० सूचनांवर चर्चा झाली.



अधिवेशनात आमदारांची अधिकाधिक ९०.९८ टक्के उपस्थिती होती, अल्प उपस्थिती ४३.८५ टक्के होती. एकूण सरासरी उपस्थिती ७५.९४ टक्के होती, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी दिली.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देत विविध मुद्द्यांना स्पर्श करीत राज्याची सद्यस्थिती व आगामी काळात करण्यात येणाऱ्या कामांबद्दल माहिती दिली.

# टीम इंडियाकडून पाकिस्तानचा धुव्वा

**दुबई : वृत्तसंस्था**

एरोन जॉर्जच्या सलग दुसऱ्या अर्धशतकासह दिपेश देवेंद्रन आणि कनिष्क चौहान यांच्या उत्तम गोलंदाजीच्या जोरावर १९ वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाने रविवारी (दि. १४) पाकिस्तानचा धुव्वा उडवला. या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघाने २४० धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना पाकिस्तानचा डाव १५० धावांत आटोपला.

हुजैफ अहसान (५८) आणि कर्णधार फरहान युसूफ यांनी ४७ धावांची भागीदारी करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण वैभव सूर्यवंशीने फरहानला बाद करत ही जोडी फोडली. अखेरीस पाकिस्तानचा संपूर्ण संघ ४१.१ षटकांत गारद झाला. भारताने हा सामना ९० धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. भारताकडून दीपेश देवेंद्रन याने सात षटकांत फक्त १६ धावा देत तीन, तर कनिष्क चौहानने १० षटकांत ३३ धावा खर्च करत तीन विकेट्स घेत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उटलला. या विजयासह भारताने उपांत्य फेरीतील आपले तिकिट जवळपास निश्चित केले आहे.

# लोक अदालतीत १७ हजार ९२० प्रकरणांचा निपटारा

**रायगड : रामप्रहर वृत्त**



दाखलपूर्व व प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा तसेच वाद सामोपचाराने मिटावेत, या उद्देशाने जिल्ह्यात दि. १३ डिसेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये वादपूर्व व दाखल अशी एकूण १७ हजार ९२० प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. या माध्यमातून पक्षकारांना एकूण ६१ कोटी १३ लाख १९ हजार ३८५ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा दिवाणी न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार संपूर्ण देशभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातही प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. सृष्टी निळकंठ यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीचे उद्घाटन मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मिलींद साठ्ये यांच्या हस्ते द्रुकश्राव्य माध्यमातून करण्यात आले.

जिल्ह्यात आयोजित लोक अदालतीमध्ये एकूण ७३ हजार ६३३ वादपूर्व प्रकरणे व १३ हजार ८९९ प्रलंबित खटले अशी ८७ हजार ५३२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १२ हजार ७५१ वादपूर्व व ५ हजार १६९ प्रलंबित अशी एकूण १७ हजार ९२० प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले.

लोक अदालतीत कौटुंबिक वादांमध्ये सामंजस्य घडून आल्याने जिल्ह्यातील ११ जोडप्यांचा संसार पुन्हा सुरळीत झाला. यामध्ये कर्जत-२, पाली-२, रोहा-२, पेण-२, मुरुड-१ व अलिबाग-२ जोडप्यांचा समावेश आहे. प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती डॉ. सृष्टी निळकंठ यांनी मनोमिलन झालेल्या जोडप्यांचे अभिनंदन केले.

राष्ट्रीय लोक अदालतीदरम्यान जिल्ह्यातील एकूण ४४ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ३ कोटी ८३ लाख ८४ हजार ७२३ रुपये इतकी नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली.

जिल्ह्यातील विविध न्यायालयांमध्ये एकूण २७ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. पक्षकारांना न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलद्वारेही अनेक प्रकरणे यशस्वीरीत्या मिटविण्यात आली.

# नवी मुंबई विमानतळावर तिसऱ्या धावपट्टीसाठी सल्लागार नियुक्ती प्रक्रिया

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर तिसऱ्या समांतर धावपट्टीच्या विकासासाठी सविस्तर तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यास करण्याकरिता सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सिडकोने सुरू केली आहे. या अभ्यासासाठी नामांकित व पात्र स्वतंत्र संस्था तसेच संयुक्त उपक्रम/संघटनांकडून निविदा मागविण्यासाठी प्रस्ताव मागणी तयार करण्यात आली आहे.

सध्या मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाला (MMR) मुख्यत्वे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (CSMIA) सेवा देत असून, त्याची प्रवासी हाताळणी क्षमता सुमारे ५० ते ५५ दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष (MPPA) इतकी मर्यादित आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर, मुंबई व नवी मुंबई येथील विमानतळांद्वारे सुमारे १५० MPPA क्षमतेची नियोजित बहुविमानतळ व्यवस्था कार्यान्वित होणार आहे. यामध्ये CSMIA ची क्षमता ५०-५५ MPPA तर NMIA ची क्षमता ९०-९५ MPPAइतकी असेल. NMIA चे आगामी विस्तार टप्पे आणि CSMIA येथील क्षमतेत वाढ यांद्वारे मध्यम कालावधीतील वाढती मागणी पूर्ण करण्यात येणार असली, तरी २०३७ नंतरच्या दीर्घकालीन हवाई वाहतूक मागणीसाठी NMIA वरील तिसऱ्या धावपट्टीसारख्या अतिरिक्त पायाभूत सुविधांचा विचार करण्यात येत आहे.

सुमारे १,१६० हेक्टर क्षेत्रावर विकसित होत असलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरवर्षी ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळण्याच्या क्षमतेसह नियोजित आहे. या विमानतळावर एकाच वेळी स्वतंत्रपणे कार्य करू शकणाऱ्या दोन समांतर धावपट्ट्या तसेच परस्पर जोडलेल्या चार प्रवासी टर्मिनल्सची उभारणी करण्यात आली आहे. यामध्ये टर्मिनल-१ ची क्षमता २० MPPA, टर्मिनल-२ ची ३० MPPA, तर टर्मिनल-३ आणि टर्मिनल-४ प्रत्येकी २० चझझ-इतकी आहे. त्यामुळे एकूण टर्मिनल क्षमता ९० चझझ-इतकी आहे. हे विमानतळ पाच टप्प्यांत विकसित करण्यात येत असून, पहिला व दुसरा टप्पा (२० MPPA क्षमता) २५ डिसेंबरपासून देशांतर्गत उड्डाणांच्या प्रारंभासाठी सज्ज आहे. पुढील टप्प्यांमध्ये २०२९ पर्यंत क्षमता ५० MPPA, २०३२ पर्यंत ७० MPPA आणि २०३७ पर्यंत ९० MPPA इतकी वाढविण्यात येणार आहे.

# महाडमध्ये स्पर्धेसाठी आलेल्या विद्यार्थिनीचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आंतरशालेय स्पर्धेसाठी अलिबागहून महाड येथे आलेल्या एका नववीतील विद्यार्थिनीचा कार्यक्रमादरम्यान अकस्मात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवार १३ डिसेंबरच्या सायंकाळी घडली. या घटनेमुळे विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये शोककळा पसरली आहे.

निधी समीर म्हात्रे (रा. बालवडे, पो. शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड) असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून ती कोएसोच्या शहाबाज विद्यालयात इयत्ता नववीत शिकत होती. १२ व १३ डिसेंबर रोजी कोकण विभागीय स्तरावरील विविध आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन महाड येथे करण्यात आले होते. यासाठी अनेक शाळांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते. वक्तृत्व स्पर्धेसाठी निधी म्हात्रे ही पारितोषिक वितरण समारंभादरम्यान व्यासपीठाजवळ छायाचित्र काढताना तिला अचानक भोवळ येऊन खाली कोसळली. तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तत्पूर्वीच तिची प्राणज्योत मालवली होती.

या घटनेची अकस्मात मृत्यू अशी नोंद महाड शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे. तिच्या दुर्दैवी मृत्यूने कोकणासह रायगड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# महायुती सरकारमुळे सिडकोच्या घरांच्या किमती झाल्या कमी!

### आमदार विक्रांत पाटील यांच्याकडून आभार

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे मिळावीत यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आमदार विक्रांत पाटील यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. सिडकोकडून उभारण्यात येणाऱ्या घरांच्या किमतींमध्ये १० टक्के दरकपात करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे.





सिडकोच्या घरांच्या वाढलेल्या किमतींबाबत आमदार विक्रांत पाटील यांनी हिवाळी अधिवेशनात भूमिका घेत शासनाचे लक्ष वेधले होते. अवास्तव दरांमुळे सामान्य नागरिक घरापासून दूर जात असल्याचा मुद्दा त्यांनी ठळकपणे मांडत, दरकपात करण्याची मागणी सातत्याने लावून धरली होती. त्यांच्या या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत महायुती सरकारने हा निर्णय घेतला.

आमदार विक्रांत पाटील यांनी या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानत, सर्वसामान्य माणसाच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# रिटघर विद्यालयात क्रीडा महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथे वार्षिक क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला.



या प्रसंगी वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य व शिक्षक, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत उत्साहाचे प्रतिक हायड्रोजन फुगे हवेमध्ये सोडून करण्यात आले.

विद्यालयातील पाचवी ते दहावी आंतरवर्गीय खो-खो, कबडडी, धावणे, गोळाफेक, भालाफेक, लंगडी इ. खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यालयातील पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्सपूर्तपणे सहभाग घेतला. या क्रीडा महोत्सवात विद्यालयातील सर्व शिक्षकांनी सहभाग घेतला तसेच अमित पाटील यांनी या क्रीडा स्पर्धांचे समालोचन केले आणि सर्व शिक्षकांनी पंचाचे काम पाहिले.

या वेळी विद्यालयामध्ये पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणमध्ये क्रीडा महोत्सव संपन्न झाला.




# लोधीवली येथे एड्स दिनानिमित्त विविध उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रिलायन्स लोधीवली येथे विश्व एड्स दिनाचे औचित्य साधून जनजागृती ॲप आरोगविषयक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रसायनी परिसरात ट्रक ड्रायव्हर आणि कामगारांत गेटसमोर पथनाटय ’साधार करण्यात आले.

तसेच पार्किंग परिसरान स्वेच्छेने एच आय व्ही तपासणी, डोळ्याची तपासणी शिबीर आणि आरोग्य विषयक विषयावर प्रश्न मंजुशा घेण्यात आली योग्य उत्तरे देणाऱ्यास बक्षीस देण्यात झाले. रिलायन्स ART केंद्रात हाडांची खनिज घनता तपासणी शिबीर आयोजीत करण्यात आले होते. ऑटिओपेनिया व ऑस्टिओपोरेसेस असलेल्या रुग्णांना आवश्यक औषधे देण्यात आली. मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते

रिलायन्स ARTद्वारे टि. बी.मुक्त भारत अभियाना अंतर्गत निक्षय पोषण योजना कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले या प्रसंगी डॉ. प्राचि नेहुलकर (साहाय्यक संचालक आरोग्य सेवा कृष्ठरोग व क्षय रोग विभाग) अक्षराज राठोड हे मान्यवर उपस्थित होते.

पोषण आहार योजनेचे मुख्य उद्दीष्ट कुपोषणाची जोखीम कमी करणे, उपचार कालावधीतील सहनशक्ती वाढवणे, रुग्णांचा बरा होण्याचा वेग बाढवणे, व आरोग्यदायी समाज निमीत्तीय मदत करणे. रिलायन्स सीएसआर या प्रकल्पा अंतर्गत सुमारे ५० क्षयरुग्णांना रिलायन्स एआरटीकडून उपचार काळात प्रोटीनयुक्त आहार कीट आणि आहार मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

## महावितरणने फेडले १२,८०० कोटींचे कर्ज

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी असलेल्या महावितरणने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतपूर्वी एकाच हफ्त्यात नुकतीच परतफेड केली. अन्य वित्तीय संस्थेकडून कमी व्याज दराचे कर्ज उभारून तसेच स्वनिधीतून ही परतफेड केली असून त्यामुळे व्याजाच्या रकमेत मोठी बचत होईल, अशी माहिती अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची सूचना केली असून त्यादृष्टीने कंपनीवरील कर्जाचा बोजा हलका करण्यासाठी यशस्वी पावले टाकण्यात आली.

# चिरनेर येथे रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील उद्योगपती राजेंद्रशेठ खारपाटील यांचा वाढदिवस १२ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करीत, पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलनात साजरा करण्यात आला. तर चिरनेर गावातील श्री महागणपती मित्र मंडळ व महिला मंडळाच्या वतीने देखील चिरनेर गावातील श्री महागणपतीच्या भव्य प्रांगणात राजेंद्रशेठ खारपाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.



विद्या संकुलनात रक्तदान शिबिराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यात उद्योगपती पी.पी. खारपाटील, राजिपचे माजी सदस्य संतोष ठाकूर, सरपंच, सुरेश पाटील, चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, उपसरपंच अरुण पाटील, माजी उपसरपंच सचिन घबाडी, पोलीसपाटील संजय पाटील, अमर ठाकूर, सुजित पाटील ,अमित मुंबईकर, अरविंद रेवसकर, गजानन ठाकूर, नितीन ठाकूर, मिलिंद ठाकूर, विश्वास ठाकूर, राकेश ठाकूर यांच्यासह व्यासपीठावर अनेक मान्यवर तसेच पंचक्रोशीतील वेगवेगळ्या क्षेत्रातील पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

राजेंद्र शेठ खारपाटील यांचे ज्येष्ठ बंधू तथा उद्योगपती पी.पी. खारपाटील, वहिनी वर्षा खारपाटील, सहचारिणी सुनिता खारपाटील, पुत्र सागर खारपाटील, पुतणे समीर खारपाटील, अर्चना खारपाटील तसेच कुटुंबातील अन्य सदस्य उपस्थित राहून त्यांचे अभीष्टचिंतन केले.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

मिडलक्लास हौसिंग सोसायटीतील श्री गणपती मंदिरात झालेल्या शिबिराला भाजप नेते संजय जैन, पंकज रूपारे, किरीट सावळा, धीरज मारू, प्रवीण गाला, नितीन शहा यांच्यासह इतरांची उपस्थिती लावली. त्याचप्रमाणे कच्छ युवक संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने रक्तदाते उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, रक्तदान हे महादान आहे. लोकप्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेऊन रक्तदान केल्याने उपस्थित रक्तदात्यांमध्ये विशेष उत्साह आणि प्रेरणा निर्माण झाली. समाजातील प्रत्येक सक्षम नागरिकाने अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

शिबिरादरम्यान रक्तदात्यांसाठी वैद्यकीय तपासणी, सुरक्षित रक्तसंकलन आणि आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचण्यास मदत होत असून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

## भाजपमध्ये जोरदार इनकमिंग

भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी म्हटले की, मी सहा-आठ महिन्यांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला. येथे जुना-नवीन असा कोणताही भेदभाव नाही. मला आणि माझ्यासोबत आलेल्या कार्यकर्त्यांना योग्य तो मान मिळतो आहे. तुम्हालाही तोच मान मिळेल. येणाऱ्या गव्हाण जिल्हा परिषद निवडणुकीत आता महायुतीशिवाय पर्याय नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

या पक्षप्रवेश सोहळ्यात शेकापचे नेते संजय नाईक, भानूदास कड्डू, वहाळ ग्रामपंचायतीचे सदस्य प्रमोद कड्डू, मोरावे गावचे ज्येष्ठ नेते रामचंद्र पाटील, चंद्रकांत पाटील, कांती मामा, शिवसेना शिंदे गटाचे नेते कुलदीप तिवारी, पोयंजे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच प्रवीण भोईर, शिवसेना उबाठा गटाचे रमेश भोईर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमास भाजपचे रविशेठ पाटील, जितेंद्र म्हात्रे, विजय घरत, विठ्ठलशेठ ओवळेकर, उत्तम कोळी, मदन पाटील, अविनाश गाताडे, निलेश खारकर, सचिन घरत, वितेश म्हात्रे, धीरज ओवळेकर, योगिता भगत, निकिता खारकर, यादवशेठ घरत, रामदास नाईक, मंगेश लबडे, प्रभूदास भोईर, संजय घरत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पक्षप्रवेशामुळे गव्हाण जिल्हा परिषद व पोयंजे पंचायत समिती क्षेत्रात भाजपची पकड अधिक मजबूत झाली असून येणाऱ्या निवडणुकांमध्ये महायुतीला याचा निश्चितच फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.

# ’रयत’च्या विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत गव्हाण विद्यालय तृतीय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत रायगड विभागीय स्तरावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत गतवर्षी अव्वल राहिलेल्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजने तृतीय क्रमांक पटकावला. डोळखांब, शहापूर येथे झालेल्या स्पर्धेत सारा वैभव घरत , प्रतिक प्रशांत नाडे व स्मित कुंदन मोकल या तीन विद्यार्थ्यांच्या गटाने सामान्य ज्ञानाच्या क्षेत्रातील बौद्धिक क्षमतेची चुणूक दाखवीत पुन्हा एकदा यशस्वी झेप घेत विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकावला.



रायगड विभागाच्या वतीने विभागीय स्तरावरच्या या स्पर्धा बुधवार दि.१०डिसेंबर २०२५ रोजी ठाणे जिल्ह्यातील डोळखांब, ता.शहापूर येथील न्यू इंग्लीश स्कूलमध्ये झाल्या. या विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत रायगड विभागातील २५ शाळांच्या संघांनी सहभाग नोंदवला. यात प्रथम व द्वितीय क्रमांक वाशी येथील संस्थेच्या अनुक्रमे मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी पटकाविला.

या वेळी विजेत्या स्पर्धकांना रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे व सहायक विभागीय अधिकारी विलासराव लेंभे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रोख रक्कम आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी डोळखांब शाखा स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विकासभाई चौधरी, नंदुशेठ डोहाळे, चंद्रकांत अधिकारी, डोळखांब विद्यालयाचे मुख्याध्यापक चंद्रकांत पाटील, मार्केट यार्ड पनवेल शाखेचे मुख्याध्यापक देवेंद्र पाटील, गव्हाण विद्यालयाचे उपशिक्षक विशांत ठाकूर व अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या विजेत्या स्पर्धकांबरोबरच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या विद्यालयाच्या दर्शना माळी यांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# बेलघर येथे विद्यार्थ्यांना टिफिन व पाणी बॉटल वाटप

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील रा. जि. प. शाळा बेलघर येथे साह्यक गटविकास अधिकारी सुनील गायकवाड व गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट दानशूर व्यक्ती व समाजसेवक मोहन जाधव व सौ. मोहिनी जाधव यांचे हस्ते विद्यार्थ्यांना टिफिन व पाणी बॉटल वाटप करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी सरपंच प्रविण आंबार्ले, लक्ष्मण भोईर सौ. रश्मी आंबार्ले, केंद्रप्रमुख मुबीन वास्कर ग्रामपंचायत हद्दीतील सर्व शिक्षक ग्रामस्थ व महिला मंडळ उपस्थित होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत लोकवर्गणी माध्यमातून मोहन नारायण जाधव (बेलघर) समाजसेवक यांनी ग्रामपंचायत हद्दीतील ५ प्राथमिक शाळेतील ६० विदयार्थ्यांना टिफिन बॉक्स आणि पाणी बॉटल जेवण चॉकलेट कॅडबरी फ्रुटी खाऊ वाटप करण्यात आले. विविध स्पर्धा घेण्यात आल्या प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावलेल्या स्पर्धकांना शालेय उपयोगी वस्तू बक्षीस देण्यात आल्या. ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्दला लोकवर्गणी मधून रक्कम ३२००० रुपयांचे वस्तू स्वरूपात मिळाले.



## निवडक

### नातेवाईकांनी चोरले दागिने

**पनवेल :** घरी पाहुणे म्हणून राहावयास आलेल्या नातेवाईकांनी दागिने चोरून नेल्याची घटना विचुंबे येथे घडली. या प्रकरणी ९ डिसेंबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. राधिका चौहान या विचुंबे येथे राहत असून त्यांचे दोन नातेवाईक ५ डिसेंबर रोजी घरी आले. त्यांनी जेवण करून घरी मुक्काम केला आणि घरातील सर्व झोपी गेले. सकाळी राधिका उठल्या असता त्यांना मोबाईल दिसून आला नाही तसेच त्यांचे नातेवाईक झोपलेले दिसले नाहीत. भिंतीच्या खिळयाला टांगून ठेवलेली बॅगदेखील सापडली नाही. आणि साहित्य विस्कटलेले दिसले. रोख रक्कम १५ हजार, सोन्याचे दागिने, चांदीच्या अंगठ्या, मोबाईल, मनगटी घड्याळ, एटीएम कार्ड सापडून आले नाहीत. त्यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### तळोजात विवाहितेवर अत्याचार

**पनवेल :** तळोजा परिसरात राहणाऱ्या विवाहितेवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीवर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० वर्षीय विवाहित महिला पती आणि मुलासह तळोजा परिसरात राहत असून आरोपी संदीप याने जून २०२५मध्ये महिलेच्या घरात प्रवेश करून आरोपीने तिच्यावर अत्याचार केला आणि लहान मुलाला मारण्याची धमकी दिली. त्यानंतर जुलैमध्ये पुन्हा अत्याचार केला. आरोपीने पीडितेला रस्त्यामध्ये गाठून तिच्या कुटुंबाला संपवण्याची धमकी दिली.

# विज्ञान प्रकल्पात एआयचा वापर करावा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा विद्यार्थ्यांना सल्ला



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग, पनवेल गणित-विज्ञान अध्यापक मंडळ तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शन झाले. या विज्ञान प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि.१३) दुपारच्या सत्रात उत्साहात झाला.

या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रकल्प तयार करताना ए.आय. तंत्रज्ञानाचा सकारात्मक आणि सर्जनशील वापर करावा. भविष्यात विविध विषयांवर वेगवेगळ्या पद्धतीने संशोधनात्मक प्रकल्प सादर करून आपली क्षमता अधिक विकसित करावी, असा मोलाचा सल्ला दिला.

१२ व १३ डिसेंबर या दोन दिवसांमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे येथे हे विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात पनवेल तालुक्यातील विविध शाळांमधून एकूण २१७ विज्ञान प्रकल्पांचा सहभाग नोंदवण्यात आला. स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाचे प्रकल्प जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवडले जाणार असून, या विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. पारितोषिक वितरणात इयत्ता सहावी ते आठवी, नववी ते बारावी, शिक्षकांचा स्वतंत्र गट, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र गट, तसेच आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र गट असे विविध गट ठेवण्यात आले होते.

या सर्व गटांमधून एकूण ६३ पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. प्रशस्तीपत्रक आणि सन्मानचिन्ह असे पारितोषिकांचे स्वरूप होते. या समारंभास विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य परेश ठाकूर, पनवेल गटशिक्षणाधिकारी शाहू सतपाल, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, वरिष्ठ विस्तार अधिकारी सिताराम मोहिते, शालेय पोषण आहार अधीक्षक नवनाथ साबळे, विस्तार अधिकारी विनोद ठाकूर, गणित-विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष पंडित फंगाळ, तसेच अभिजित मटकर, पंकज भगत, सुभाष गोपी, प्रसाद म्हात्रे, भालचंद्र पाटील, बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते.

परेश ठाकूर यांनी, विद्यार्थ्यांच्या मनातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अशा प्रकारच्या विज्ञान प्रदर्शनांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे असून, यामुळे विद्यार्थ्यांची कल्पकतेची भरारी अधिक उंचावते, असे मत व्यक्त केले. लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, कामोठे यांच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शन झाले.

## सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धेचा समारोप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयात ८ ते १३ डिसेंबर या सप्ताहात वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या वार्षिक क्रीडा स्पर्धेत १०० मीटर, २००मीटर, ४००मीटर, ८००मीटर धावणे, गोळा फेक, बुद्धिबळ, रस्सीखेच, डॉजबॉल, क्रिकेट यासारख्या वैयक्तिक तसेच सांघिक खेळांचा समावेश करण्यात आला होता. प्राचार्य प्रशांत मोरे यांचे संपूर्ण मार्गदर्शन या क्रीडा स्पर्धांसाठी लाभले. सहा दिवस सुरू असलेल्या या वार्षिक क्रीडा स्पर्धांमध्ये ज्युनिअर कॉलेजच्या अनेक विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, यांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये विजय संपादन केलेल्या खेळाडूंचा सुवर्ण, रौप्य, कास्य पदके, सन्मानचिन्ह तसेच प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

क्रीडा स्पर्धेचे यशस्वी नियोजन ज्युनिअर कॉलेजचे क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी यांनी केले होते. स्पर्धेचे परीक्षण, समालोचन तसेच शिस्त या सर्व जबाबदाऱ्या ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात या वार्षिक क्रीडा स्पर्धा झाल्या.



**पनवेल : भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या.**

## सोन्याचे मंगळसूत्र खेचून पसार होणाऱ्या त्रिकुटापैकी दोघांना अटक



**पनवेल : वार्ताहर**

महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पसार होणाऱ्या त्रिकुटापैकी दोघांना अजमेर राजस्थान येथुन पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

फिर्यादी ज्योती जानकर, (वय ६०) या पनवेल हद्दीतील वडाळे तलाव स्मशानभूमी येथून घरी जात असताना आरोपीत यांनी रिक्षा मधुन येवून त्यांच्या गळ्यातील दोन सोन्याचे मंगळसुत्र खेचुन चोरी करून पळुन गेले होते. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात होताच, वपोनि नितीन ठाकरे यांचे मागर्दशनाखालील तपास पथकाने तांत्रिक तपास व सी.सी.टी. व्ही. फुटेजच्या आधारे आरोपी मोहम्मद इर्शाद मोहम्मद नौशाद सिध्दीकी (वय २२, धंदा-रिक्षा चालक रा.गोवंडी) व त्याचा सहकारी अफरोज फिरोज शेख (वय १८, रा. गोवंडी तसेच आवेश यांनी रिक्षा मधुन येवून त्यांचे सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पसार झाले होते.

अधिक तपासात यातील दोघेजण हे अजमेर राजस्थान येथे लपून बसल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर ठिकाणी जाऊन अटक केली आहे. तर पाहिजे आरोपी आवेश याचा शोध सुरू आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण






**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.१३) वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी प्रमुख पाहुण्यांचे व इतर सर्व मान्यवरांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्याप्रसंगी महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल-२०२५-२६ सादर करण्यात आला. सदर पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विजय दाभोळकर प्राचार्य, जय हिंद कॉलेज मुंबई यांनी उपस्थित राहुन विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले व त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र प्रदान केली तसेच शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व संस्थेचे व्हाईस चेअरमन श्री वाय. टी. देशमुख यांनी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले. या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर, राहुल घरत सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था न्यू पनवेल यांनी उपस्थित राहुन स्पर्धेत विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके दिली व शुभेच्छा दिल्या.

या वेळी निशा नायर मुख्याध्यापिका रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर, जयदास तेलवणे, प्रभाकर जोशी, सचिन वासकर, दीपक शिंदे, सीडीसी मेंबर, रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर, टी. एन. सुतार प्राचार्य, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे, संतोष खांदेकर, मुख्याध्यापक, रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय आदी मान्यवर उपस्थित राहून विजेत्यांना प्रमाणपत्र व पारितोषिके प्रदान करण्यात आली व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयात प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनीनी व पालक यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातील सर्व प्राध्यापक, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोलाचे सहकार्य केले. या वेळी विविध गुणदर्शन मोठ्या उत्साहात करण्यात साजरा करण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रा. गणेश जगताप, सीकेटी महाविद्यालय व प्रा. ऐश्वर्या पाटोळे, बी.सी.टी. लॉ महाविद्यालय न्यू पनवेल, यांनी परीक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नीलम मोरे व प्रा. तनुजा सुमन यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी मानले.

## उरण नाईकनगर येथे रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिर व हेल्मेट वाटप



**उरण : वार्ताहर**

उरण नाईकनगर येथे लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी आणि द्रोणागिरी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतर्गत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात पालकांना व विद्यार्थ्यांना हेल्मेट भेट देण्यात आली.

रस्ते अपघात टाळण्यासाठी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व यावेळी उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत एकूण ३५० हेल्मेटचे वाटप करण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून आयोजकांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी आणि द्रोणागिरी फाउंडेशन भविष्यातही अशा जनहितकारी उपक्रमांचे आयोजन करणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले. आयसीआयसी लॉम्बर्ड आणि सेवा सहयोग फोउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी गणेश पाटील, अजय म्हात्रे, विनय बर्वे, साहेबराव ओहोळ, अंकन शाह, डॉ. नमिता मिश्रा, विजय गणात्रा आदी उपस्थित होते. तसेच लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी अध्यक्ष भूमिका सिंग, सचिव मोनिका चौकर, नम्रता पुंकर, लायन राहुल भोईर, गोपाळ विटकर हे पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते. या उपक्रमासाठी दीपक दळी, सुमेध पाटील, पप्पू सूर्यराव या सर्व मान्यवरांची मोलाची मदत लाभली.

## श्रीमद्‌भगवदगीता पठण स्पर्धेची अंतिम फेरी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल व श्री गुरुकुलम् न्यास यांच्या वतीने आयोजित श्रीमद्‌भगवदगीता पठण स्पर्धा या स्पर्धेच्या खुल्या गटाची अंतिम फेरी १३ डिसेंबर २०२५ रोजी सिकेटी महाविद्यालय, खांदा कॉलनी येथे झाली.

प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीत निवड झालेल्या नऊ स्पर्धकांनी या अंतिम फेरीमध्ये सहभाग घेतला. खुल्या गटात प्रथम श्रुती संदीप विरकर, द्वितीय नीता लक्ष्मण भुजबळ, द्वितीय निवेदिता मधुकर नाईक, तृतीय शैला शरदराव कन्नडकर विजेते झाले आहेत. शालेय गटाचा निकाल जाहीर झाल्यावर बक्षीस वितरण समारंभ एकत्रित घेण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



## ज्येष्ठ नागरिक साप्ताहिक सभेत मानवी हक्क दिवस





**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक हॉल या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक साप्ताहिक सभेत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस संपन्न झाला.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांचे मागर्दशनाखाली मानवी हक्क दिवस कार्यक्रम झाला. या वेळी मानवी हक्क म्हणजे काय, मानवी हक्क दिवस का साजरा केला जातो. भारतातील मानवी हक्कांचे संरक्षण, मानवी हक्कांचे महत्व व विद्यार्थ्यांनी काय शिकावे, तसेच सायबर सुरक्षितता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधी कायदे व अधिकार याबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली. कार्यक्रमास १५० ते २०० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## सीकेटी कॉलेजमध्ये विशेष अतिथी सत्र





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात महिला विकास कक्ष आणि स्त्री मुक्ती संघटना, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.११) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आणि जागतिक महिला दिनाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून माझी स्त्रीवादाची कल्पना या विषयावर विशेष अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले.

या व्याख्यानासाठी संगीता सराफ या स्त्री मुक्ती संघटनेच्या सदस्या प्रमुख वक्त्या लाभल्या होत्या. तसेच या वेळी अनिता पाटील या स्त्री मुक्ती संघटनेच्या सदस्यदेखील उपस्थित होत्या. या वेळी महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी महिला विकास कक्षा अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली त्याचबरोबर स्त्री मुक्ती चळवळीची पार्श्वभूमी सांगून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. नंतर प्रमुख वक्त्या संगीता सराफ यांनी विद्यार्थ्यांना स्त्रीवाद ही संकल्पना समजावून सांगून आजच्या युगातील स्त्रीवादाची प्रासंगिकता तसेच स्त्री मुक्ती चळवळ यावर माहिती दिली. आभार प्रा. सोनाली हुद्दार यांनी मानले.

# पेणच्या स्ट्राँगरूममध्ये उंदराची करामत

## प्रशासनाची धावाधाव; सीसीटीव्ही फुटेजमुळे सत्यता नागरिकांसमोर

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषद निवडणुकांच्या मतपेट्या ठेवलेल्या स्ट्रांगरूममध्ये आश्चर्याची घटना घडली. स्ट्रांग रूममधील एका टेबलाच्या कपाटाचा दरवाजा उघडलेल्या अवस्थेतील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला, मात्र सीसीटीव्ही फुटेज बघितल्यानंतर खरी परिस्थिती समोर आली. सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर उंदरानेच दरवाजा उघडल्याचे पहायला मिळाले आहे.



फोटो व्हायरल होताच पेणमधील नागरिकांमध्ये शंका कुशंका व्यक्त केल्या जात होत्या. स्ट्रांग रूमच्या टेबलाच्या कपाटाचा दरवाजा उघडल्याचे समजताच पेणमधील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या घटनेबद्दल तत्काळ संशय व्यक्त केला आणि सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उभे केले. हा दरवाजा नक्की कोणी उघडला, याची शहानिशा करण्यासाठी पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी तातडीने सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेज पाहिल्यानंतर अधिकारी आणि सर्वच पक्षांच्या नेत्यांना आश्चर्याचा धक्का बसला कारण, चक्क एका उंदराने काही प्रयत्नांनंतर कपाटाच्या हँडलला स्पर्श करून दरवाजा उघडल्याचे स्पष्ट झाले. पेण तहसील कार्यालयाच्या आवारातील ज्या स्ट्रांगरूममध्ये नगर परिषद निवडणुकांसंदर्भातील महत्त्वाच्या मतपेट्या आणि साहित्य ठेवले आहे, तेथे ही 'उंदराची करामत' घडली. या घटनेनंतर वाढलेला संशय आणि गैरसमज दूर करण्यासाठी पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी तातडीने हस्तक्षेप केला. त्यांनी घटनेची गंभीर दखल घेत उपस्थितांना सीसीटीव्ही फुटेज दाखवले आणि उंदरामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले.

# कुंडलिका नदी प्रदूषणाच्या विळख्यात



**रोहा : प्रतिनिधी**

रोह्याची जीवन वाहिनी म्हणून ओळख असलेल्या कुंडलिका नदी आता प्रदुषणाच्या विळख्यात सापडली आहे. भविष्याच्या दृष्टिकोनातून कुंडलिका नदी संवर्धन करण्याची गरज आहे. परंतु लोकप्रतिनिधींचा जाणीवपूर्वक कुंडलिका नदीकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

रायगड जिल्ह्यातील अनेक नद्यांपैकी बारमाही वाहणाऱ्या नद्यांमध्ये कुंडलिका नदीचं वरचा क्रमांक लागतो. बारमाही वाहणारी व स्वच्छ पाणी या नदीचे वैशिष्ट्य होते. रोहा तालुक्यातील सुतारवाडी ते न्हावे या परिसरातून पूर्वी ही नदी नागरिकांना जीवनदायी ठरत होती. गोफण पुढे कुंडलिका समुद्रात काही काही अंतरावर समाविष्ट होत असते.मानवी वस्त्यांसह पशु प्राण्यांना या नदीतील पाण्याचा उपयोग होत असत. त्यामुळे कुंडलिकेच्या तीरावर अनेक गावी वसलेले दिसत आहेत. या गावांना पूर्वी पिण्याचा पाण्याचा प्रश्न नदीमुळे भासत नव्हता.

बारमाही वाहणारी व स्वच्छ पाणी देणारी कुंडलिका नदी आज तिचे रूप बदललेले दिसून येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातून येणाऱ्या सांडपाणी मुळे आधीच कुंडलिका नदी प्रदूषित झाली होती. नदीवर अवलंबून असलेल्या मच्छीमारांचा उदरनिर्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहेच. तर नदीपात्राच्या किनारी असलेल्या अनेक शेतकऱ्यांची शेती नापीक झालेले दिसून येत आहे.

या नदीच्या पात्रात अधून मधून सांडपाणी अनेक ग्रामपंचायतीसह नगर परिषदेच्या हद्दीतून सोडले जात आहे. स्वच्छ व निर्मळ म्हणून ओळख असलेल्या कुंडलिका नदीच्या पात्रात आज पाणी दूषित झाल्याचे दिसून येते. मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी कचरा व वाहनांची स्वच्छता नदीच्या पात्रात केली जाते. काही ठिकाणी मानवी मैला ही सोडण्याचा प्रकार अधून मधून घडल्याची दिसून आले.

कुंडलिका नदीच्या किनारी काही ठिकाणी नदीच्या पात्रालगत अनाधिकृत बांधकाम झालेले आहे. आज कुंडलिका नदीची अवस्था बिकट आहे. मानवी वस्तीतून थेट कुंडलिका नदीच्या पात्रात सांडपाणी जात असल्याने ही नदी पूर्णपणे प्रदूषित झाले आहे. अनेक सामाजिक संघटनांनी सामाजिक कार्यकर्त्यांनी हा प्रश्न सातत्याने मांडला आहे. परंतु स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने या प्रश्नाकडे दुर्लक्षित केला आहे. पूर्वी या नदीवर अवलंबून असलेल्या गावांना आता उन्हाळ्यात या पाण्याचा उपयोग होत नसल्याने या गांवाना पाणीटंचाई भासत असल्याचे चित्र आहे.

वाढते नागरीकरण पाण्याचे सुनियोजित नियोजन नसल्याने भविष्यातील पाण्याचा विचार केला असता कुंडलिका नदी वाचवण्याची गरज आहे.भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा प्रश्न बनू नये यासाठी कुंडलिका नदी वाचण्याची गरज आहे.

## कर्जतमध्ये विज्ञान प्रदर्शन

**कर्जत** : खाड्याचा पाडा येथील शालेय विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात शाळेतील पहिली ते चौथी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी वेगवगेळ्या संकल्पना प्रत्यक्षात आणून हे प्रदर्शन यशस्वी केले.




रायगड जिल्हा परिषद शाळा खाड्याचापाडा यांनी व्यद्यर्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. हे विज्ञान प्रदर्शन खाड्याचा पाडा गावातील सामाजिक सभागृहात आयोजित केले होते. शाळेचे शिक्षक देवेंद्र नाटीकार आणि मधुकर विषे यांच्या संकल्पनेतून हे विज्ञान प्रदर्शन भारावले होते. या वेळी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ठेवण्यात आलेल्या प्रतिकृती यांचे परीक्षण करण्यासाठी शेजारच्या गावातील शाळेचे शिक्षक यशवंत वेखंडे हे उपस्थित होते.

## पोलादपूर तालुक्यात पारा घसरला!

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूरकरांना गेल्या दोन दिवसांपासून भरदिवसादेखील थंडीची लाट अनुभवण्यास मिळत आहे. शनिवारी सकाळी सव्वासात वाजेपर्यंत सूर्योदय झाला नसताना फक्त बारा अंश सेल्सियस एवढे न्यूनतम तापमान या ॲप्लिकेशनवर नोंदले गेल्याने फेब्रुवारी २०१९मध्ये निर्माण झालेली थंडीची लाट यावर्षी डिसेंबर महिन्यातच अनुभवण्यास मिळत असल्याने पोलादपूरकर गारठले आहेत.




पोलादपूर तालुक्यात नोव्हेंबर अखेरपर्यंत पावसाचा जोर दिसून आल्यामुळे यंदा पावसाळा येत्या मे महिन्यापर्यंत असल्याची धारणा पोलादपूरकरांमध्ये उपहासपूर्वक व्यक्त होत असताना अचानक थंडीने कहर करण्यास सुरूवात केली आहे. ऑक्टोबर हिटचा यंदा काही दिवस तडाखा बसला तरी पावसाने संततधार कायम ठेवली होती. शनिवारी सकाळी सव्वासात वाजता पोलादपूर तालुक्यात पारा खुपच खाली उतरल्याचे ऍक्युव्हेदर या मोबाईल ऍप्लीकेशनवरून दिसून आले. शनिवारी सूर्योदय पावणेआठ वाजेपर्यंत लांबणीवर गेला असताना वातावरणात कडाक्याची थंडी जाणवून तापमान केवळ १२ अंश सेल्सियस एवढे घसरले. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हे तापमान ९ अंश सेल्सीयसपर्यंत होते असे काही पोलादपूरकरांचे म्हणणे आहे.

धुके आणि गारव्यामुळे पोलादपूरकरांना दरवाजे खिडक्या बंद करून अंगात उष्णता निर्माण करणारे उबदार कपडे परिधान करून वावरावे लागत आहे. अनेकांनी रस्तोरस्ती शेकोटया पेटवून चहाचे घोट घेत थंडीवर मात करण्याची उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे.

## गुलाबी थंडीत पालीमध्ये राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा भव्य महोत्सव

**पाली : प्रतिनिधी**

प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने पालीत १८ डिसेंबर पासून राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा रंगणार आहेत. ऐन गुलाबी थंडीत पालीत राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा बहार पहावयास मिळणार असल्याने नाट्यप्रेमी सुखावले आहेत. प्रख्यात समाजसेवक, नामवंत उद्योजक प्रकाशभाऊ देसाईंच्या वाढदिवसानिमित्त पालीत नाट्यप्रेमींना राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची अनोखी पर्वणी अनुभवयास मिळणार आहे, त्यामुळे साऱ्यांचीच उत्कंठा शिगेला पोहचली आहे.



तर स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून सर्वेसर्वा प्रकाशभाऊ देसाईंच्या अचूक मार्गदर्शन, महत्वपूर्ण सहकार्य व प्रतिष्ठान चे सर्व पदाधिकारी, सभासद यांच्या श्रमातून या स्पर्धा यशस्वी होणार असल्याचा विश्वास प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव यांनी व्यक्त केलाय. दरवर्षी या स्पर्धा थंडीच्या दिवसांत आयोजित केल्या जातात, यावेळी हवामान आल्हाददायक असते, या गुलाबी थंडीतील स्पर्धा' पहायला प्रेक्षकांची अलोट गर्दी उसळते.

या स्पर्धांमध्ये अप्रतिम अभिनय, दिग्दर्शन, लेखन, आणि सादरीकरण पहावयास मिळते. या स्पर्धेत राज्यभरातून तसेच ग्रामीण भागासह बड्या शहरातून स्पर्धक सहभागी होतात. युवा कलाकारांचा उत्साह आणि नवीन प्रयोग पाहण्याची संधी रसिक प्रेक्षकांना मिळते.

या स्पर्धा १३ वर्षांपासून अविरत पणे सुरू आहेत. येथील ग.बा. वडेर हायस्कुल पालीच्या भव्य रंगमंचावर या स्पर्धा होणार आहेत. जनता या स्पर्धेवर प्रेम करते. जनतेला या एकांकिका स्पर्धेची ओढ लागलेली असते. स्पर्धेच्या उद्घाटनास सिने अभिनेते व विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर या स्पर्धेचा समारोप व बक्षिस समारंभ २४ डिसेंबरला होणार आहे.

समारोपावेळी नाट्यरसिकांना पाहण्यासाठी एक दर्जेदार नाटक मोफत असणार आहे. प्रसिद्ध समाजसेवक व नामवंत उद्योजक, प्रकाशभाऊ देसाई यांच्या वाढदिवसानिमित्त मागील अनेक वर्षांपासून राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा यशस्वीपणे संपन्न होत आहेत.

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत एस.पी. महाविद्यालयाचा श्रवण कदम प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

माहीम मुंबई यांच्या विद्या मंदिर मंडळाच्या नेरळ ममदापूर येथील मातोश्री टिपणीस कला आणि वाणिज्य महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत १७ महाविद्यालये सहभागी झाली होती. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक पुणे येथील एस.पी. महाविद्यालयाच्या श्रवण कदम याने पटकावले.



विद्या मंदिर मंडळ मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस कला व वाणिज्य महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस' यांच्या स्मृती दिनानामित्त आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करते.या स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी विद्या मंदिर मंडळाचे संयुक्त कार्यवाह विवेक पोतदार, माजी अध्यक्ष डॉ. भरतकुमार लाड, विश्वस्त डॉ मिलिंद पोतदार, उपाध्यक्ष अरुण धारप हे प्रमुख उपस्थित होते.

सुरुवातीला या स्पर्धेबद्दल प्राचार्य डॉ नंदकुमार इंगळे यांनी माहिती दिली.या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत १७ महाविद्यालयांचा सहभाग होता. रायगड, पालघर, पुणे, मुंबई, ठाणे अशा विविध जिल्ह्यातून स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेसाठी समाजातील दैनंदिन घडामोडी यांच्याबाबतचे अनेक विषय ठेवण्यात आले होते. सध्याच्या राजकारण लोकशाहीचा उत्सव की ढोंग, समाजमाध्यम अभिव्यक्ती स्वातंत्र्य व्यासपीठ आणि अफवांचा बाजार. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून साहित्यिक दिलीप गडकरी आणि माजी मुख्याध्यापक पी. बी. राठोड यांनी काम पाहिले.

## 'ध्येय निश्चित केल्यावर संधीचे दरवाजे उघडतात'

**मुरूड : प्रतिनिधी**

उच्च शिक्षणाची जोड मिळाली तर ज्ञानाची क्षितिजे विस्तारतात, परंतु आधी ध्येय निश्चित केले पाहिजे. सातत्य आणि मेहनतीची साथ मिळाली की यश हमखास मिळते. तेव्हा विद्यार्थ्यांनी भरपूर परिश्रम घ्यावेत. ध्येय निश्चित केल्याशिवाय संधीचे दरवाजे उघडत नाहीत, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन कत्तार स्थित उद्योजक डॉ. सनाउल्लाह घरटकर यांनी केले.

मुरूड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात डॉ. घरटकर फाउंडेशनतर्फे आयोजित करीयर गाईडन्स मार्गदर्शन शिबिरात विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर डॉ. सनाउल्लाह घरटकर, फाऊंडेशनचे अध्यक्ष राशीद फहीम, विश्वस्त शाहिद कलाब, नांदगाव पंचक्रोशी हायस्कूलचे चेअरमन इरफान हलडे, संजीवनी आरोग्य संस्थेचे विभाग प्रमुख डॉ. मकबुल कोकाटे, कार्याध्यक्ष विजय सुर्वे, कीर्ती शहा, समुपदेशक वैशाली बोबडे वैद्य, अहसान सैय्यद सईदा कारबारी आदी उपस्थित होते. या वेळी वैशीली बोबडे – वैद्य व अहसान सैय्यद, सईदा कारबारी यांचेही मार्गदर्शन झाले.



## विक्रम मिनिडोअर टॅक्सी चालक मालक संघटना प्रलंबित मागण्यांसाठी एकवटल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सहा आसनी रिक्षा, विक्रम मिनीडोअर, इको, मॅजिक टॅक्सी मालक व चालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. आपल्या प्रलंबित मागण्यांबाबत दोन वर्षांपूर्वी सकारात्मक चर्चा होऊनदेखील वरिष्ठ अधिकारयांकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याची त्यांची तक्रार आहे.

अलिबाग स्थानकापासून निघालेला मोर्चा पोलीसांनी हिराकोट तलावाजवळ अडवला. तेथे मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. सहा आसनी वाहनांची वयोमर्यादा किमान पाच वर्षांनी वाढवावी, सहा आसनीच्या परवान्यावर सहा आसनी बदली वाहन द्यावे, पासिंग फी साडेचार हजार रूपयांवरून नऊ हजार रूपये करण्यात आली आहे. ही भरमसाठ वाढ कमी करावी, माणगाव येथील पासिंग ट्रॅक तातडीने सुरू करावा, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

दोन वर्षांपूर्वी इको टॅक्सीला बसवलेल्या व्हीएलटीडी डिव्हाईसने गाडया पासींग झाल्या. परंतु यावर्षी हे डिव्हाईस पासींगसाठी वापरले जात नाही. नवीन डिव्हाइस बसवण्यासाठी अतिरिक्त खर्च होत असून ही लूट थांबवावी अशी मागणी या वेळी लावून धरण्यात आली. ऑनलाइन टॅक्सी परमिट बंद करावेत, तसेच परमिट ट्रान्सफर टॅक्स, ट्रान्सफर फी संदर्भातील मागण्या करण्यात आल्या. आंदोलकांच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांची भेट घेवून सविस्तर चर्चा केली व आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

आपल्या मागण्यांबाबत १७ मार्च २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत चर्चा झाली होती. या बैठकीतील चर्चेनुसार सकारात्मक निर्देश शिंदे यांनी दिले होते, परंतु परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकारी त्याची अंमलबजावणी करत नाहीत. त्यामुळे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची लूट सुरू असल्याचा आरोप या वेळी संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील यांनी केला आहे.




### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **धर्मेंद्र गणा म्हात्रे व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पिरकोन (५५३३३९)** (PU-ID : 32909383069), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २२४/१/अ खाते क्रमांक : १५४ | १ | ०.१०.५० पो.ख. ०.००.७० **एकुण ०.११.२०** | १.१५ |
| **एकुण क्षेत्र ०.११.०० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्येक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१



### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

ई–मेल : panvelcorporation@gmail.com | दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com | वेबसाईट – panvelcorporation.com

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक– २०२५**
**प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्धीची**
**जाहीर सूचना**

मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र.रानिआ/मनपा–२०२५/प्र.क्र.४१/का–५ दि.१३.११.२०२५ च्या सुधारीत वेळापत्रकानुसार पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस आस्तित्वात असलेल्या पनवेल विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिकाच्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता तयार केलेली प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागवण्यासाठी दि.२०.११.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मा. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्र. रानिआ/मनपा–२०२५/प्र.क्र.४१/का–५ दि.२६.११.२०२५ ने सुधारित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दि.०३.१२.२०२५ होता. सदर दिनांकापर्यंत प्राप्त हरकती व सूचनाबाबत योग्य ती कार्यवाही पूर्ण करून पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रभाग क्र.१ ते २० च्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या सुधारीत कार्यक्रमानुसार नागरिकांच्या माहितीसाठी सोमवार दि.१५.१२.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून सदरच्या अंतिम मतदार याद्या खालील नमूद ठिकाणी मतदाराच्या व नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१. पनवेल महानगरपालिका मुख्यालय (निवडणूक विभाग)
२. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.panvelcorporation.com)
३. महानगरपलिकेची सर्व प्रभाग कार्यालय व उपविभाग नावडे.

जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ७०८/७३२/२०२५
दिनांक :– १४/१२/२०२५

**सही/–**
**आयुक्त– I**
**पनवेल महानगरपालिका**

# उरणमध्ये श्रमदानातून वनराई बंधारे

## तालुका कृषी विभागाची मोहीम सुरू



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुका कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या अक्कादेवी धरणाला जोडणाऱ्या ओढ्यावर शनिवारी (दि.१३) श्री महागणपती सेंद्रिय गटातील शेतकऱ्यांच्या श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला आहे. वनराई बंधारे शेतकऱ्यांसाठी आणि पशु पक्षांसाठी वरदान ठरत आहेत.

वनराई बंधारे बांधून पाणी अडविले तर या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागत असतात. सध्या कृषी विभागामार्फ वनराई बंधारे बांधण्याची मोहीम सुरू झाली असून, तालुक्यात अजून बऱ्याच ठिकाणच्या ओढ्यांवर वनराई बंधारे बांधण्यात येणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, कृषी सहाय्यक सुषमा गायकवाड, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली.

या वेळी शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, संजय पाटील, भास्कर ठाकूर, बाळकृष्ण मोकल, जगन ठाकूर, जगदीश ठाकुर, दामोदर मुंबईकर, बाळकृष्ण ठाकूर, समाधान म्हात्रे, रवींद्र ठाकूर, समाधान पाटील, मंगेश ठाकूर, रघुनाथ ठाकूर, बळीराम फोफेरकर, रमेश म्हात्रे चंद्रकांत म्हात्रे, अविनाश पाटील, कृष्णा म्हात्रे, गजानन म्हात्रे, प्रमोद मोकल, हिराजी ठाकूर आदींनी श्रमदानातून बंधारा उभारण्यास सहकार्य केले.

**वनराई बंधाऱ्यात साठलेल्या पाण्याचा वापर गुरांची तसेच जंगली प्राण्यांची तहान भागवण्यासाठी करता येईल. शिवाय परिसरातील शेतकऱ्यांना भाजीपाल्याचे उत्पादन घेता येईल. यातून रोजगाराचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.**
**-अर्चना सुळ-नारनवर, तालुका कृषी अधिकारी**

**वनबंधारे बांधताना सिमेंटच्या गोणीमध्ये माती भरून प्रवाह असलेल्या ठिकाणी माती भरलेल्या गोणी एकावर एक रचून ठेवल्यास काही महिने पाणी या ठिकाणी जमा होऊन भूजल पातळी वाढण्यास मदत होते.**
**-सुषमा गायकवाड, कृषी सहाय्यक अधिकारी**

# गव्हाण विद्यालयामध्ये ७८० मुलींना स्वसंरक्षणाचे धडे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवम चारिटेबल ट्रस्ट, बदलापूर ठाणे येथील विभूती सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.१३) अखेर श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनियर कॉलेज गव्हाण कोपर येथे महिनाभरात एकूण ७८० विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले.

१६ नोव्हेंबर ते१३ डिसेंबर २०२५ अखेर विद्यालयातील ७८० विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्याचे कार्य शिवम चारिटेबल ट्रस्ट ने केल्याबद्दल या प्रशिक्षण शिबिर शृंखलेच्या समारोप दिनी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून आभार व्यक्त करण्यात आले. या वेळी पर्यवेक्षिका शशिकला पाटील व सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील उपस्थित होत्या.

अंतिम टप्प्यामधील मुलींच्या स्वसंरक्षण शिबिराचा समारोप शनिवार१३ डिसेंबर २०२५ रोजी झाला. या वेळी प्रशिक्षणासाठी इयत्ता पाचवी व सहावीच्या मुलींची निवड करण्यात आली. शृंखलेतील समारोपीय सत्रात सुमारे १३० विद्यार्थ्यींनींनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला. या वेळी शिवम चारिटेबल ट्रस्टच्या कार्यकर्त्या सुर्वे मॅडम आणि मार्गदर्शक प्रशिक्षक अनिकेत जाधव तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी मैथिली जाधव त्यांचा शिष्य आरिफ यांनी विद्यार्थिनींना किक बॉक्सिंग, कॉलर ग्रेप, विपन्स, नेक चोक ही प्रात्यक्षिके दाखविली.

अनिकेत जाधव सरांनी अतिशय उत्तम रित्या विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम केले आणि यातूनच प्रेरित होऊन काही मुलींनी या प्रात्यक्षिकामध्ये उत्साहाने नेतृत्व केले. या वेळी बोलताना विभुती सुर्वे यांनी यापुढेही विद्यार्थ्यीनींना मार्गदर्शन करण्याविषयी आश्वसित केले.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात 'सीकेटी'चे विद्यार्थी चमकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे ५३वे तालुकास्तरीय आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या तनिष्का योगेश गावंड (नववी/बी), ऋषभ तानाजी देशमुख (नववी/बी), तपन सनातन पोडिली (नववी/ए) यांनी प्रदर्शनात द्वितीय क्रमांक प्राप्त केला.



विज्ञान, गणित आणि रोबोटिक्स विषयाच्या मार्गदर्शक यांनी या उपक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.विद्यालयातील सर्व विज्ञान शिक्षक यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी मॅडम, सर्व शिक्षक यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आजपासून एनईपी अभिमुखता व संवेदनशीलता कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात यूजीसी-मालवीया मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र (पूर्वीचे यूजीसी-मानव संसाधन विकास केंद्र), मुंबई विद्यापीठ यांच्या सहकार्याने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० संदर्भात यूजीसी प्रायोजित 'एनईपी ओरिएंटेशन अँड सेन्सिटायझेशन प्रोग्राम'चे आयोजन करण्यात आले आहे. हा ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम १५ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून, महाविद्यालयीन, प्राध्यापक व शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासकांसाठी तो अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणातील महत्त्वाचे बदल, बहुविषयक शिक्षणपद्धती, क्रेडिट प्रणाली, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम व उच्च शिक्षणातील सुधारणा याबाबत सखोल मार्गदर्शन या कार्यक्रमात देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन एनईपी व सेमिनार अँड वर्कशॉप कमिटी यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख तसेच सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे यांचे या उपक्रमाला मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. रीत ठुले कार्यरत असून, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे व प्रा. प्रथमेश उदेकर (समन्वयक, वर्कशॉप व सेमिनार कमिटी) यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहे. या ओरिएंटेशनसाठी भारतातील वेगवेगळ्या विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील १०० पेक्षा अधिक प्राध्यापकांनी नोंदणी केली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मदत होईल, तसेच उच्च शिक्षणाची गुणवत्ता अधिक वृद्धिंगत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या उपक्रमामुळे शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडून येऊन शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी नवे दालन खुले होणार असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

# तेजस कांडपिळेंच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त आणि माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी आणि सांस्कृतिक उपक्रमांची उल्लेखनीय परंपरा जपली आहे. स्वर्गीय जनार्दन कांडपिळे यांच्या स्मरणार्थ भिंगारी येथील मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी दोन लाख २२ हजार २२२ रुपयांचा धनादेश नवनाथ मित्रमंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्त करण्यात आला.



धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे जतन आणि संवर्धन व्हावे, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. याच कार्यक्रमातजेष्ठ नागरिकांचा सत्कार, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध भजनी मंडळे, ब्रास बँड व सांस्कृतिक पथकांना आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

पोदी येथील ओमकार भजनी मंडळाला स्पीकर व कॅसीओ, तक्का येथील मोराज कॉलनीतील गणेश भजनी मंडळाला पखवाज, काळुंद्रे येथील श्री गणेश भजनी मंडळाला पखवाज व स्पीकर, नवीन पनवेल सेक्टर १६ मधील श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाला हार्मोनियम बॉक्सपेटी, तर पोदी येथील संत सावता माळी प्रसाद भजनी मंडळाला हार्मोनियम बॉक्सपेटी देण्यात आली. तसेच तक्का येथील श्रीकृष्ण कला सर्कल, मनोशक्ती ब्रास बँड, भिंगारी श्री नवनाथ म्युझिकल बँड ग्रुप, काळुंद्रे येथील श्री मंगलमूर्ती बिट्स या ब्रास बँड व बँजो पथकांना रोटो सेट व सिम्बॉल्स प्रदान करण्यात आले. याशिवाय कातकरीवाडी, पोदी येथील आदिशक्ती एकवीरा देवस्थानाला भांडी वाटप करण्यात आले.

या उपक्रमांचे कौतुक करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, वाढदिवसानिमित्त वायफळ खर्च करण्यापेक्षा, ज्यांच्यामुळे आपण काहीतरी बनू शकलो अशा व्यक्तींचे स्मरण ठेवून समाजासाठी योगदान देणारी माणसे फार कमी असतात. ही भावना जपत तेजस कानपिळे यांनी आजचा कार्यक्रम आयोजित केला, त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन. या कार्यक्रमाला जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते जयंत पगडे, अजय कांडपिळे, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंजारराव यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक भान, सांस्कृतिक जतन आणि सेवाभावी दृष्टिकोन यांचा सुरेख संगम साधत माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी साजरा केलेला हा वाढदिवस अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.





**पनवेल : भारतीय जनता पक्ष नवीन पनवेल शहर मंडळ सरचिटणीसपदी संज्योत शेळके यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.**

# भाजप नेते बबन बारगजे यांच्या वाढदिवसानिमित्त 'खेळ पैठणीचा'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष श्री बबन बारगजे यांचा वाढदिवस सोमवार १५ डिसेंबर रोजी कळंबोली मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे वाढदिवसानिमित्त कळंबोली मधील सेक्टर ४ येथील उद्यानात महिलांसाठी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे



या कार्यक्रमांमध्ये विविध बक्षिसे वितरित केली जाणार आहेत. त्याचबरोबर कराओके गाण्यांचासुद्धा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे रात्री साडेआठ नंतर अभिष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे या सर्व कार्यक्रमासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, सचिव रविशेठ पाटील, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक रवींद्र भगत, बबन मुकादम, अशोक मोटे, मोनिका महानवर, सरस्वती कथारा व मंडळातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते विविध मंडळाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी आपण सर्व मंडळींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे व बबन बारगजे यांना शुभ आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन भाजपा कळंबोली चिटणीस बायजा बबन बारगजे यांनी केले आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर' पुस्तकाचे वाशीत प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

युद्धाचे नियोजन करताना, नेमके युद्ध केंव्हा थांबवायचे, हा एक महत्त्वाचा निर्णय असतो. ऑपरेशन सिंदूर मध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा बदला म्हणून, त्यांचे तळ उध्वस्त करून त्यांचे मोठे नूकसान करणे, हे आपले उद्दिष्ट होते आणि हे उद्दिष्ट आपण साध्य केले होते. या व्यतिरिक्त भारताने केलेल्या हल्ल्यात नूरखान हवाई तळावर असलेल्या पाकिस्तानी अणुबाँबच्या साठ्याचे नुकसान झाले आणि तेथून अणूकिरणोत्सर्गाची गळती सुरू झाली. अणूयुद्धाचा धोका वाढू नये यासाठी आपण वेळेवर युद्ध थांबवण्याचे हे सुद्धा एक कारण होते.



खरे तर चीनला वाटत होते की, भारत पाकिस्तान युद्ध खूप दिवस चालेल आणि जसे रशिया -युक्रेन आणि इस्राएल-हमास युद्धात अडकले, तसेच भारतही या युद्धात फसेल. ज्यामुळे भारताची आर्थिक प्रगती खुंटून जाईल. अशा प्रकारे ऑपरेशन सिंदूरच्या संघर्ष समाप्तीसाठी योग्य वेळी अचूक निर्णय घेतल्याबद्धल आपण आपल्या राजकीय आणि लष्करी नेतृत्वाचे कौतुक करायला हवे, असे प्रतिपादन ब्रिगेडिअर हेमंत महाजन यांनी केले.

ब्रिगेडिअर हेमंत महाजन यांनी लिहिलेल्या ऑपरेशन सिंदूर, पाकिस्तान, चीनबरोबर भारतीयांचे दीर्घकालीन युद्ध (बदलता भारत- संयमातून सडेतोड उत्तराकडे) या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त ते बोलत होते. सावरकर विचार मंच, नवी मुंबई तर्फे शुक्रवारी १२ डिसेंबर रोजी वाशी येथील गुजरात भवन सभागृहात हा प्रकाशन सोहळा आयोजित केला होता.

पुस्तकाचे प्रकाशन माजी खासदार संजीव नाईक यांच्या हस्ते करण्यात आले तर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी या कार्यक्रमास दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे विश्वस्त मंजिरी मराठे, राजेंद्र वराडकर, सावरकर विचार मंचचे अध्यक्ष संतोष कानडे, प्रकाश मोरे, अजय वाळुंज व्यासपीठावर उपस्थित होते.

ब्रिगेडिअर हेमंत महाजन यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारा ऑपरेशन सिंदूर बद्धलचे विश्लेषण आपल्या व्याख्यानातून केले. बहुआयामी युद्धनीती, सायबर, माहिती आणि अंतराळ युद्ध, सिंधू पाणी कराराचा फेरविचार, आत्मनिर्भर भारताचे शस्त्रसामर्थ्य आणि भविष्यातील धोके या विषयीची माहिती त्यांनी उपस्थित श्रोत्यांना करून दिली.

सावरकर विचार मंचाचे अध्यक्ष संतोष कानडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी संजीव नाईक, मंजिरी मराठे यांनी हेमंत महाजन यांच्या पुस्तक प्रकाशनास आपल्या भाषणातून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची उपस्थिती विशेष लक्षणीय ठरली.

# भटके श्वान नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पनवेल पंचायत समिती येथे सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भटके श्वान नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड डॉ. सचिन देशपांडे यांच्या दिलेल्या सूचनेनुसार गटविकास अधिकारी पनवेल समीर वाठारकर व सहाय्यक आयुक्त ता.ल. पं. स. चि. पनवेल डॉ. समीर तोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ११ डिसेंबर रोजी पंचायत समिती पनवेल येथे सभा घेण्यात आली.



या सभेमध्ये भटके श्वान नियंत्रण कार्यक्रमात अंतर्गत सुप्रीम कोर्ट यांच्या आदेशाची, नगर विकास विभाग यांचे परिपत्रक, ग्रामविकास विभाग यांच्या परिपत्रक तसेच एडब्ल्यूबीआय मार्फत जारी झालेल्या एसओपी पत्रकाचे सविस्तर वाचन करून माहिती सर्व ग्राम विकास अधिकारी यांना प्रत्यक्षात देण्यात आली तसेच ग्रामपंचायत पातळीवर भटके श्वान नियंत्रण कमिटी स्थापन करण्याच्या सविस्तर सूचना व मार्गदर्शनवरील सर्व परिपत्रकाचे वाचन करून डॉ. आनंद मारकवार पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती पनवेल यांनी सर्व उपस्थित ग्रामविकास अधिकारी यांना मार्गदर्शन केले. या सभेस सहा. गट विकास अधिकारी आर बी कोलटक्के, संतोष ठोंबरे विस्तार अधिकारी पनवेल, महेश घबाडी विस्तारा अधिकारी, सागर पाटील, कनिष्ठ प्रशासन अधिकारी पंचायत समिती उपस्थित होते.

# वळके येथील सामाजिक बहिष्कारप्रकरणी गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वळके (ता. मुरूड) येथे गेल्या जवळपास दहा वर्षांपासून एका कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकल्याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात सामाजिक बहिष्कार प्रतिबंध अधिनियम २०१६ अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची फिर्याद मधुकर नारायण भगत (वय ६६, रा. वळके, ता. मुरुड) यांनी ११ डिसेंबर २०२५ रोजी रेवदंडा पोलीस ठाण्यात दिली. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार सन २०१६पासून ८ सप्टेंबर २०२५पर्यंत गावातील समाज मंदिर येथे आरोपींकडून त्यांच्या कुटुंबाला बेकायदेशीरपणे वाळीत टाकण्याचे प्रकार सुरू होते.




यातील आरोपी शंकर कमळ्या सावंत, गोपीनाथ सहदेव म्हात्रे, सुधाकर धनंजय भगत, राजेंद्र गणपत भगत, कमळाकर तुकाराम पाटील, किसन धर्मा म्हात्रे, शरद महादेव म्हात्रे, अनंता कमळ्या धोत्रे, कमलाकर महादेव म्हात्रे, भारत लखमा सावंत, राजीबाई महादेव भगत, निर्मल जनार्दन भगत, कुसुम गजानन म्हात्रे, सुधीर गंगाजी सावंत, नारायण चांगू वाजंत्री, जनार्दन रामा भगत, लीलाधर लक्ष्मण काटकर, अनिल मधुकर धनावडे, नथुराम सुदाम धनावडे, आत्माराम वामन म्हात्रे, सुभाष हाशा सावंत, अमोल मनोहर भगत, शंकर पद्माकर भगत, जनार्दन नागू म्हात्रे, राजेंद्र धर्मा पाटील, हरिश्चंद्र रामा म्हात्रे, किसन धर्मा म्हात्रे, महादेव नागू भगत, हरिश्चंद्र झिटू म्हात्रे, अरुण मधुकर धनावडे (सर्व रा. वळके, ता. मुरुड, जि. रायगड) आहेत.

फिर्यादी यांनी गावातील महिला संबंधित अन्यायकारक निर्णय, गाव पंचांचे दंड, वर्गणी, फंड आणि बेकायदेशीर वसुली यास विरोध केल्याने आरोपींनी त्यांना व त्यांच्या कुटुंबाला गावातून वाळीत टाकले, सामाजिक बहिष्कार केला आणि दहा वर्षांची दंडाची मागणी केली, असा आरोप फिर्यादीने केला आहे. आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबाचे मानसिक खच्चीकरण करण्याच्या उद्देशाने, प्रत्येकी ५००० रुपये दंड आणि १००० रुपये व्याज अशी रक्कम वसूल करण्याचा दबाव आणला होता, असेही फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे.

फिर्यादींच्या वडिलांच्या अंत्यविधीस गावकऱ्यांनी सहभागी होऊ नये असा फतवा आरोपींकडून काढण्यात आला. सहभागी झाल्यास त्यांनाही बहिष्कृत केले जाईल, असा इशारा देण्यात आला होता.

तरीही सहभागी झालेल्या चंद्रकांत श्रीराम भगत, राहुल यशवंत काटकर, पदीबाई महादेव काटकर, धनंजय धनावडे यांना प्रत्येकी ५००० रुपये दंड ठोठावण्यात आला. त्यापैकी चंद्रकांत भगत व राहुल काटकर यांच्याकडून १०,००० रुपये प्रत्यक्ष वसूल केल्याचे तक्रारीत नमूद आहे. धनंजय धनावडे यांनी दंड न दिल्याने त्यांच्यावरही बहिष्कार टाकण्यात आल्याचा फिर्यादीचा आरोप आहे. या प्रकरणाचा अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाणे करत आहे.

# माणगाव-इंदापूर बायपासचे काम वेगात; पावसाळ्यापूर्वी निर्णायक टप्पा

◆ आठ पुलांची समांतर कामे, मेपर्यंत एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली; तर मुंबई-गोवा महामार्ग २०२७पर्यंत पूर्ण होणार

**माणगाव : प्रतिनिधी**



कोकणच्या दळणवळणाचा कणा असलेल्या मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव-इंदापूर बायपासच्या कामाला अखेर अपेक्षित गती मिळाली आहे. माणगावजवळील कळमजे ते मुगवली जोड रस्ता तसेच इंदापूर बायपास या दोन्ही ठिकाणी कामे युद्धपातळीवर सुरू असून या मार्गावरील लहान-मोठ्या आठ पुलांची उभारणी एकाच वेळी केली जात आहे. सध्या ४००हून अधिक कामगार, अभियंते व तांत्रिक कर्मचारी दिवसरात्र काम करत असून पावसाळ्यापूर्वी महत्त्वाची टप्प्याटप्प्याची कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.

पेण येथील मुख्य कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार मे महिन्यापर्यंत बायपासची किमान एक मार्गिका पूर्ण करून वाहतुकीसाठी खुली करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे माणगाव व इंदापूर शहरातून जाणारी जड वाहतूक बायपासवर वळवता येणार असून शहरातील वाहतूक कोंडी, अपघातांची शक्यता आणि प्रवाशांचा वेळेचा अपव्यय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. तसेच संपूर्ण मुंबई-गोवा महामार्ग २०२७पर्यंत पूर्ण करण्याचा केंद्र सरकारचा निर्धार असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

**ठप्प कामातून वेगाकडे**

माणगाव व इंदापूर बायपासचे काम अनेक वर्षे रखडलेले होते. मागील ठेकेदाराने काम अत्यंत संथ गतीने केल्याने ठेका रद्द करण्यात आला होता. त्यानंतर बराच काळ काम ठप्प राहिल्याने नागरिकांचा संयम सुटत चालला होता. व्यापारी, विद्यार्थी, प्रवासी आणि रुग्णवाहिका यांना वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसत होता. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ॲड. राजीव साबळे यांनी माणगाव शहरातील नागरिकांना एकत्र करत आंदोलनाचा इशारा दिला होता. या आंदोलनाची गंभीर दखल घेत खासदार सुनील तटकरे यांनी दिल्लीमध्ये केंद्र स्तरावर पाठपुरावा करत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन प्रकल्पातील अडथळ्यांची माहिती दिली. त्यानंतर प्रशासकीय पातळीवर हालचाली वेगाने घडल्या आणि काम पुन्हा सुरू झाले.

**सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि अडचणींचे निराकरण**

खासदार सुनील तटकरे यांनी या महामार्गाच्या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करत दरमहा संबंधित अधिकारी, कंत्राटदार व यंत्रणांच्या आढावा बैठका घेतल्या. वनविभागाची परवानगी, कोकण रेल्वे समन्वय, भूसंपादन, पुनर्वसन, मोबदला व नुकसानभरपाई यांसारख्या गुंतागुंतीच्या बाबी टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यात आल्या. परिणामी आर्थिक व प्रशासकीय अडथळे दूर होऊन प्रत्यक्ष कामाला गती मिळाली.

**नेमकी कोणती कामे सुरू?**

सध्या बायपास मार्गावर आठ पुलांची उभारणी, सर्व्हिस रोडची कामे, बायपासचा मुख्य रस्ता, काँक्रीटीकरण, गडर बसविणे, मातीचा भराव, रस्ता मजबुतीकरण, ड्रेनेज व सुरक्षेसाठी आवश्यक संरचना अशी अनेक कामे समांतर सुरू आहेत. आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून दर्जेदार व टिकाऊ काम करण्यावर भर दिला जात आहे.

**जनतेला मोठा दिलासा**

मेपर्यंत एक मार्गिका सुरू झाल्यास माणगाव व इंदापूर परिसरातील वाहतूक कोंडीला मोठा दिलासा मिळणार आहे. प्रवाशांचा प्रवास वेळेत व सुरक्षित होईल, व्यापार-उद्योगाला चालना मिळेल आणि कोकण पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांनाही मोठा फायदा होणार आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर प्रत्यक्षात वेगात सुरू झालेल्या या कामामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून उर्वरित कामही नियोजित वेळेत पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# श्रीवर्धनमध्ये झाडे तोडून कचरा नगर पालिकेच्या गटारात टाकला; नगर परिषदेने कारवाई करण्याची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील करदमे मोहल्ला व प्रभू आळी नाक्याच्या कोपऱ्यावरच असलेल्या डॉ. कासीम युनुस राऊत चौकात एका जागा मालकाने आपल्या जागेमध्ये असलेली विविध प्रकारची झाडे तोडून त्याच्या फांद्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या गटारात टाकून दिलेल्या आहेत.



समोर बागवान मशीद आहे. या मशिदीच्या कंपाउंड वॉलच्या बाजूलादेखील फांद्या फेकून देण्यात आल्या आहेत. वास्तविक पाहता स्वतःच्या जागेतील झाडे तोडल्यानंतर जागेतील एका कोपऱ्यात या झाडांच्या फांद्या रचून ठेवता आल्या असत्या, परंतु केवळ नगर परिषदेचे सफाई कर्मचारी सदरच्या फांद्या उचलून नेतील या अपेक्षेनेच जागा मालकाने हे कृत्य केल्याचे दिसून येत आहे.

स्वच्छ व सुंदर अशा श्रीवर्धन शहराला अशा प्रकारे कचरा टाकणाऱ्यामुळे विद्रुपता येत आहे. या अगोदरदेखील श्रीवर्धन नगर परिषदेला स्वच्छतेमध्ये चांगल्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे.

शहरात कोणत्याही ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसत नाहीत किंबहुना गटारे तुंबलेली पाहायला मिळत नाहीत. श्रीवर्धन नगर परिषदेने संबंधित जागा मालकाला नोटीस देऊन दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# शेखर पालकर अध्यक्षपदी

**पोलादपूर :** तालुक्यातील सुवर्णकार व्यापारी आणि कारागिर संघटनेच्या अध्यक्षपदी शेखर सखाराम पालकर तथा बाळा पालकर यांची एकमताने निवड झाली.



उपाध्यक्षपदी दीपक पालकर, खजिनदारपदी वैभव केळकर, कार्याध्यक्षपदी प्रदीप पालकर, सल्लागारपदी संजय पालकर व सुभाष पालकर, सदस्यपदी अमोल सागवेकर, चंद्रकांत नगरकर, उमेश पालकर, दीक्षा नगरकर यांची निवड झाली आहे.

# गतिमंद विद्यार्थ्यांना ओळखपत्र प्रदान



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील आरसीएफ वसाहतीत असलेली आत्मनिर्भर पालक संचलित व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्रातील गतिमंद विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्यात आले. आरसीएफ प्रशासनाने वसाहतीत प्रवेश करण्यासाठी ओळखपत्र आवश्यक असल्याचे सांगितल्याने या विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने या शाळेतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षक व कर्मचाऱ्यांना मोफत ओळखपत्र देण्यात आले.

या वेळी मुख्याध्यापिका सुजाता देसाई, रायगड फोटोग्राफर्स ॲंड व्हिडीओ ग्राफर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, शाळेचे संचालक नागेश कुलकर्णी, उपस्थित होते.

# माणगाव क्रीडा संकुल भग्नावस्थेत; साहित्य भंगारात, सुविधांपासून खेळाडू वंचित, सुधारणा करण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील क्रीडा विकासाचा कणा मानले जाणारे क्रीडा संकुल आज अक्षरशः भग्नावस्थेत असून येथील खेळाडूंमध्ये तीव्र असंतोषाची भावना पसरली आहे. कधीकाळी खेळाडूंच्या सरावाने गजबजलेले हे संकुल आज दुर्लक्ष, उदासीनता आणि निष्क्रियतेचे प्रतीक बनले आहे.

संकुलातील खेळांचे व व्यायामाचे साहित्य मोडकळीस आले असून काही साहित्य अडगळीत, तर काही थेट भंगारात पडले आहे. परिणामी नव्या साहित्याच्या प्रतीक्षेत असलेले खेळाडू आजही रिकाम्या हाताने सराव करत आहेत.



क्रीडा संकुलाची इमारत ठिकठिकाणी तडकलेली, गळती लागलेली व असुरक्षित अवस्थेत दिसून येत आहे. पावसाळ्यात छतामधून पाणी गळत असल्याने आतील भागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. संकुलाला संरक्षण भिंत नसल्यामुळे मौल्यवान क्रीडा साहित्य चोरीला गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

या क्रीडा संकुलाचे भूमिपूजन २००४ साली झाले होते, तर उद्घाटन २००९मध्ये तत्कालीन मंत्री व सध्याचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले होते. विशेष म्हणजे, या संकुलासाठी धवलारकर या दानशूर व्यक्तीने शासनाला जमीन दान दिली होती, मात्र आज त्याच जागेवर उभे असलेले संकुल खेळाडूंना उपयोगी पडत नसल्याचे चित्रत आहे.

माणगाव व परिसरातील अनेक खेळाडू आजही राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत, मात्र हे यश त्यांनी क्रीडा संकुल आधुनिक सुविधा किंवा प्रशिक्षकांशिवाय, केवळ स्वतःच्या जिद्दीतून मिळवले आहे. पुरेशा मैदानांचा अभाव, सरावासाठी साधनसामग्री नसणे आणि स्पर्धांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक खेळाडू मोठ्या स्पर्धांपासून वंचित राहत आहेत. परिणामी त्यांच्या करिअरच्या संधी मर्यादित होत असून क्रीडा क्षेत्रातील स्थानिक प्रतिभा दडपली जात आहे.

खासदार सुनील तटकरे, मंत्री भरत गोगावले. मंत्री आदिती तटकरे यांनी तातडीने लक्ष घालून क्रीडा संकुल पुनर्जीवित करावे, अशी मागणी होत आहे.


# पोपटीसाठी खवय्ये गावठी वालाच्या प्रतीक्षेत; वातावरणीय बदलामुळे उत्पादन लांबणीवर!

**पाली : प्रतिनिधी**

अवकाळी पावसाने प्रथमतः खरीप हंगामातील भातशेतीतून तोंडाशी आलेला घास शेतकऱ्याकडून हिरावून घेतला. त्यानंतर रब्बी हंगामात भाजीपाला लागवड आणि कडधान्याची नासाडी केली आहे. त्यातच आता ऐन गुलाबी थंडीत वातावरणीय बदलाचा फटका तूर, वालाच्या शेंगा उत्पादक शेतकऱ्यानाही बसल्याचे चित्र रायगड जिल्ह्यातून समोर येत आहे, कारण आतापर्यंत वालाच्या शेंगाचे उत्पादनच झालेले नाही. त्यामुळे शेंगाप्रेमींना, खवय्यांना ग्रामीण भागातील गावठी शेंगांसाठी वाट पहावी लागणार आहे.

यापूर्वी वालाच्या शेंगांची आवक मार्गशिष महिन्यापासून चांगल्या प्रमाणात होत होती, मात्र मागील एक दोन वर्षांपासून अवकाळी पाऊस अधूनमधून हजेरी लावत असल्याने वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर जात असल्याचे पहायला मिळत आहे. सद्यस्थितीत रायगडातील भाजीपाला बाजारात उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा अधिकतम बाहेरील जिल्ह्यातून येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन थंडीत शेंगाप्रेमींच्या जिभेला हव्या असणाऱ्या ग्रामीण मधील गावठी शेंगांच्या पोपटीच्या माध्यमातून चवीचा आस्वाद घेता घेत नसून गावठी शेंगांची पारख असलेले ग्राहकांचा हिरमोड होत आहे. असे ग्राहक बाजारात येणाऱ्या शेंगा खरेदी करण्यास कानाडोळा करत असून गावठी शेंगांच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसून येत आहे.





वालाच्या शेंगांचे उत्पादन जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत मोठ्या प्रमाणात होत होते, परंतु मागील काही वर्षांपासूनच्या अवकाळीने भातशेतीसह भाजीपाला, कडधान्याचा अक्षरशः चुराडा केला असतानाच आता भातशेतीतील लावणी आणि कापणीचा कालावधी लांबल्याने कडधान्ये, वालाच्या शेंगांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही गणित कोलमडले असून शेंगांच्या उत्पादनाची प्रतीक्षा करावी लागत असाल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावा लागत आहे.

अलीकडील बदलत्या हवामान स्थितीचा पिकांवर परिणाम होत असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात चालू हंगामात पावसाचा कालावधी अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात लांबल्यामुळे जमिनीत जास्त काळ ओलावा टिकून राहिला. खरीप पिकांपैकी भात कापणीस विलंब झाला, याचा थेट परिणाम म्हणून रब्बी हंगामातील कडधान्य पिकांच्या पेरणीस उशीर झाला. विशेष म्हणजे खरीपातील वाल व कडधान्ये पिकांच्या जातीवरती या हवामान बदलाया प्रतिकूल परिणाम झाला आहे.


# घोसाळगड परिसरातील ऐतिहासिक ठेवा उजेडात

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील घोसाळगडाच्या पायथ्याशी इतिहासाला उजाळा देणारा अत्यंत महत्त्वाचा पुरावा वन्यजीव अभ्यासक रोशन म्हात्रे व सह्याद्रीत गडकिल्ले भटकंती करणारे सुजल पडवळ यांनी शोधून काढला आहे. येथील खडकात कोरलेल्या गोलाकार खळग्यांच्या पद्धतशीर मांडणीतून हा खेळ मंकला प्रकारातील प्राचीन कातळ पटखेळ असल्याचे स्पष्ट झाले आहे. याबाबत कुतूहल म्हणून हा दुर्मिळ ऐतिहासिक ठेवा पाहण्यासाठी अनेकजण आपली पाऊले गडाच्या दिशेने टाकत आहेत.

या ठिकाणी तब्बल ५० मंकला पटखेळ सापडले असून अजूनही सापडण्याची शक्यता आहे व त्या दृष्टीने संशोधनदेखील सुरू आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रात एकाच ठिकाणी ५० मंकला पटखेळ कुठेच आढळून आले नसल्याचे म्हणणे काही अभ्यासकांचे आहे. रोशन म्हात्रे व सुजल पडवळ यांनी अत्यंत परिश्रमाने हा अमूल्य ठेवा उजेडात आणला आहे. विशेष म्हणजे सह्याद्री डोंगररांगांत या खेळाचे पुरावे अत्यल्प असल्यामुळे घोसाळगड परिसरात आढळलेला हा पुरावा अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक महत्त्वाचा ठरतो. या शोधामुळे घोसाळगडाच्या परिसरात प्राचीन वसाहत आणि व्यापारी मार्गांचे संकेत मिळतात.





**प्राचीन मंकला खेळाचे कातळ कोरीव पट आढळले**

ऐतिहासिकदृष्टचा असे कातळ खेळ पाण्याजवळ, वस्ती किंवा रहदारीजवळ, सामूहिक जमावाच्या ठिकाणी, पुरातन व्यापारी मार्गांवर कोरले जातात. यावरून घोसाळगडाच्या पायथ्यात प्राचीन वसाहत, व्यापाऱ्यांचे विसाव्याचे स्थळ किंवा व्यापार-वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग होता, अशी ठोस शक्यता समोर येते. याचा अर्थ या परिसरातून नियमित मानववस्ती, व्यापारी हालचाल आणि सामाजिक-सांस्कृतिक संवाद होत होता. यातून प्राचीन काळातील खेळ, सामाजिक जीवन व स्थानिक संस्कृती यांचे एकत्रित चित्र स्पष्ट होऊन त्यावर प्रकाश पडला आहे.

घोसाळगडावजवळील मंकाला खेळाची मांडणी व विविध पद्धती रोशन म्हात्रे व सुजल पडवळ यांनी केलेल्या प्रत्यक्ष निरीक्षणात विविध प्रकारच्या खेळपट्टचा आढळल्या. धार्मिक व सांस्कृतिक कोरीव काम आसपास दिसून आले. त्यामध्ये शिवलिंगाकार आकृती, सरळ व वर्तुळाकार रेषा व उथळ खोदकाम आढळले. हे पुरावे धार्मिक व सांस्कृतिक मिश्रित स्थळ असल्याची शक्यता दर्शवतात तसेच येथे वेगवेगळ्या आकाराच्या व वेगळ्या खळग्यांच्या संख्यच्या ५०हून अधिक मंकला सापडल्या आहेत. त्यामध्ये सर्वात मोठी ३÷१६ व सर्वात लहान ३÷२ आहे. शिवलिंगसदृश्य चार, अपरिचित गोलाकार मांडणी असलेले खळगे चार आहेत तसेच दुर्मिळ म्हणजे एका समाधीवर मंकला कोरलेली आढळली आहे.

# मुंबईचा हरयाणावर दमदार विजय

## सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धेत यशस्वी जैस्वालचे शतक

**पुणे : प्रतिनिधी**

भारताच्या टी-२० संघात स्थान पक्के करण्याच्या दृष्टीने यशस्वी जैस्वालने रविवारी (दि. १४) दमदार पाऊल टाकल. सय्यद मुश्ताक अली स्पर्धेच्या सुपर लीग गटाच्या सामन्यात यशस्वीने तडाखेबंद शतक झळकावले. पुण्याजवळच्या अंबी येथील डीवाय पाटील अकादमी मैदानावर झालेल्या या लढतीत हरयाणाने मुंबईसमोर २३५ धावांचे मोठे लक्ष्य दिले होते. यशस्वीच्या खणखणीत शतकाच्या बळावर मुंबईने १५ चेंडू आणि चार विकेट्स राखून सामना जिंकला.



मुंबईचा कर्णधार शार्दूल ठाकूरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. खेळपट्टीतला ओलसरपणा गोलंदाजांना सहाय्यकारी ठरेल हा त्याचा अंदाज सपशेल चुकला. हरयाणाने फलंदाजांना अनुकूल खेळपट्टीवर धावांच्या राशी ओतल्या. हरयाणाचा कर्णधार अंकित कुमारने ४२ चेंडूत १० चौकार आणि सहा षटकारांसह ८९ धावांची दिमाखदार खेळी साकारली. निशांत सिंधूने ३८ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारासह नाबाद ६३ धावांची खेळी करत त्याला चांगली साथ दिली. समांत जखरने १४ चेंडूत ३१ धावांची, तर सुमीत कुमारने चार चेंडूत १६ धावांची उपयुक्त खेळी केल्या. हरयाणाने २० षटकात २३४ धावांचा डोंगर उभारला. मुंबईचा कर्णधार शार्दूल ठाकूरने स्वत:सह सहा गोलंदाजांचा प्रयोग केला, पण साईराज पाटीलचा अपवाद वगळता कोणालाही विकेट्स पटकावता आल्या नाहीत.

मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वाल आणि कर्णधार अजिंक्य रहाणे जोडीने चौथ्या षटकातच अर्धशतकी सलामी दिली. इशांत भारद्वाजने रहाणेला बाद करत ही जोडी फोडली. त्याने १० चेंडूत २१ धावा केल्या. यानंतर यशस्वी-सर्फराझ जोडीने मनमुराद फटकेबाजी करत मुंबईच्या विजयाचा पाया रचला. या जोडीने ३७ चेंडूत ८८ धावा चोपून काढल्या. अवघ्या २५ चेंडूत नऊ चौकार आणि तीन षटकारांसह ६४ धावांची खेळी करून सर्फराझ बाद झाला. अंगक्रिश रघुवंशी (७) आणि सूर्यांश शेडगे (१३) मोठी खेळी करू शकले नाहीत. कर्णधार शार्दूल ठाकूरही दोन धावा करून तंबूत परतला.

एकीकडे विकेट्स पडत असतानाही यशस्वीने आक्रमण सुरूच ठेवले. त्याने ४८ चेंडूतच शतक गाठले. टी-२० क्रिकेटमधले त्याचे हे चौथे शतक आहे. शतकानंतर लगेचच जखरच्या गोलंदाजीवर तो बाद झाला. यशस्वीने ५० चेंडूत १६ चौकार आणि एका षटकारासह १०१ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. साईराज पाटील आणि अथर्व अंकोलेकर यांनी मुंबईच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

धावांचा पाठलाग करतानाची या स्पर्धेतली दुसऱ्या क्रमांकाची धावसंख्या आहे. शतकी खेळी साकारणाऱ्या यशस्वीलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. यशस्वीने सर्फराझला बोलावून त्याच्याबरोबर पुरस्कार शेअर केला.

### सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लबची भरारी

# १५ शूटर्सची राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

६८व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी सिद्धांत रायफल आणि पिस्तूल शूटिंग क्लब रायगडच्या १५ नेमबाजांची निवड झाली आहे. ही स्पर्धा मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथे ११ डिसेंबर ते २ जानेवारीदरम्यान होईल.

५० मीटर प्रोन रायफलमध्ये किरण रामचंद्र माळी (कानसई, अंबरनाथ), अजिंक्य भावे (अलिबाग), गौरव जगदीश ठाकूर (चिरनेर, उरण), कुणाल पाटील (जासई, उरण), अथर्व काळे, नंदकुमार माने (नवी मुंबई पोलीस), डॉ.अनन्द कृष्णमूर्थी (नवी मुंबई), सिमरजीतसिंग परमार (मुंबई), सोहम जाधव, दिग्विजय चौगुले, पार्थ तोडकर (श्रीवर्धन, रायगड) महाराष्ट्र रायफल संघटनेचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ते प्रशिक्षक



अलंकार कोळी यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहेत.

दरम्यान, ११ डिसेंबर ते ४ जानेवारीदरम्यान डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंज, दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय शूटिंग नेमबाजी स्पर्धेकरिता नेमबाजांची निवड झाली. यामध्ये वेदांत किशन खारके हा १० मीटर पिस्तुल व २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तुलमध्ये, किशन खारके १० मीटर पिस्तूल, २५ मीटर स्टँडर्ड पिस्तूल, २५ मीटर सेंटर फायर पिस्तूल व ५० मीटर फ्री पिस्तूलमध्ये सहभागी होतील. १० मीटर पिस्तूलमध्ये सुप्रिता सुबुद्धी आणि अवनी अलंकार कोळी महाराष्ट्र रायफल संघटनेचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सेक्रेटरी राष्ट्रीय नेमबाज किशन खारके, प्रितम पाटील, महेश फुलोरे, अजिंक्य अर्जुन चौधरी, समाधान घोपरकर, अविनाश भगत, सुरज थळे, सागर भोईर, प्रकाश दिसले, लिलेश भगत, संदेश पाटील, शैलेश पाटील, जगदीश पाटील, जयदास पाटील, सुनील मढवी, राजू मुंबईकर, समीर आंबवणे तसेच क्लबचे सर्व मेंबर्स, मित्र परिवार यांनी राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# सिडको ओपन आंतरराष्ट्रीय गोल्फ स्पर्धा

## खारघरमध्ये १६ डिसेंबरपासून प्रारंभ, एक कोटींचे पारितोषिक

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको आणि प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीजीटीआय) यांनी रविवारी (दि. १४) संयुक्तरीत्या लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो प्रस्तुत सिडको ओपन २०२५ या उद्घाटनपर स्पर्धेची घोषणा केली. या गोल्फ सामन्यांकरिता एक कोटी रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले असून १६ ते १९ डिसेंबर या कालावधीत भव्य खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे हे सामने होणार आहेत.

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) या स्पर्धेचे आयोजक असून लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो सादरकर्ते भागीदार (प्रेझेंटिंग पार्टनर) आहेत. या सामन्यांमध्ये १२६ व्यावसायिक खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्येकी १८ होल्सकरिता स्ट्रोक-प्ले पद्धतीने चार फेऱ्यांमध्ये सामने खेळविले जातील. दोन फेऱ्यांनंतर टॉप ५० खेळाडूंची निवड करण्यात येईल. गोल्फ कोर्सकरिता ७२ पार आहे.

स्पर्धेत युवराज संधू, अर्जनु प्रसाद, मनु गंडास, अंगद चीमा, खालिन जोशी आणि ओम प्रकाश चौहान यांसारखे नामांकित भारतीय खेळाडू सहभागी होणार आहेत.

श्रीलंकेतील एन थंगराजा व के प्रबागरन, बांगलादेश येथील जमाल हुसैन, एमडी सिद्दीकुर रहमान, बादल हुसैन, नेपाळ येथील सुभाष तमांग, झेक प्रजासत्ताक येथील स्टेपन डानेक, इटली येथील मायकेल ओर्टोलानी व फेडेरिको झुकेट्टी, अमेरिकेतील कोईचिरो सातो आणि युगांडा येथील जोशुआ सील हे नामांकित परदेशी खेळाडू सहभागी होणार आहेत.



स्थानिक गोल्फपटूंमध्ये नवी मुंबईतील मनोज कुमार, मयूर ठाकूर आणि पंकज ठाकूर, तर मुंबईतील बजरंग माने यांचा समावेश आहे.

या सामन्यांद्वारे भविष्यातील गोल्फ चॅम्पियनकरिता जागतिक दर्जाच्या सुविधा आणि व्यासपीठ उपलब्ध होत आहे. या सामन्यांमधील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे खेळाडूंना समर्पित भावनेने आपले उद्दिष्ट साध्य करण्यास प्रेरणा मिळणार आहे, असे सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले.

जगातील आर्थिक केंद्र असणाऱ्या शहरांमध्ये खेळला जाणार हा खेळ असून देशाच्या आर्थिक राजधानीमध्ये पीजीटीआय सामन्यांचे आयोजन करण्याचा एक वेगळाच आनंद आहे. या निसर्गरम्य गोल्फ कोर्सवर देशातील उत्तम प्रतीच्या गोल्फपटूंना आपली गुणवत्ता दाखवण्याची संधी मिळणार असून सामन्यांच्या आयोजनासाठी लाभलेल्या सहकार्याकरिता आम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिडको आणि लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो यांचे आभारी आहोत, असे पीजीटीआयचे अध्यक्ष कपिल देव म्हणाले.

**सिडको ओपन २०२५ या आंतरराष्ट्रीय गोल्फ सामन्यांचे आयोजन हा सिडकोसाठी अभिमानाचा क्षण असून उदयोन्मुख खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासह गोल्फला प्रोत्साहन देणे हा या सामन्यांच्या आयोजनाचा उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार विकसित करण्यात आलेल्या १८ होल्सच्या खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथ प्रथमच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.**

**-विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

**महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने नवी मुंबईतील खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे प्रथमच पीजीटीआय सामन्यांचे आयोजन करण्याचा आम्हाला आनंद होत आहे. हा गोल्फ कोर्स देशातील गोल्फसंबंधित विस्तारणाऱ्या सोयी सुविधांचे निदर्शक असून नवीन प्रदेशांत आणि समूहांपर्यंत गोल्फ पोहचविण्याकरिता हे सामने महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. यामुळे नवी मुंबई आणि इतर प्रदेशांतील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल.**

**-कपिल देव, अध्यक्ष, पीजीटीआय**

# ...म्हणून मेस्सीने मैदान सोडले!

## कोलकात्यामधील घटनेचे कारण आले समोर



**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकात्यात लियोनेल मेस्सीचा बहुप्रतिक्षित गोट टूर कार्यक्रम फक्त २२ मिनिटातच गुंडाळण्याची वेळ आली. व्हीआयपी लोकांचीच गर्दी, गर्दीवर नियंण ठेवण्याची कुचकामी ठरलेली व्यवस्था आणि सुरक्षेच्या कारणास्तव मेस्सीला स्टेडियम सोडणे भाग पडले. यानंतर चाहत्यांमध्ये संतापाची लाट पसरली आणि स्टेडियममध्ये तोडफोडीला सुरुवात झाली.

स्टेडियमचे गेट सकाळी ८ वाजताच उघडण्यात आले. मेस्सी ११.३० वाजता आपल्या इंटर मियामी टीमचे सहकारी लुईस सुआरेज आणि रोड्रिगो डी पॉल सोबत मैदानात उतरला. काही मिनिटांतच मेसीला राजकारणी, पोलीस अधिकारी, व्हीआयपी व त्यांच्या टीमने घेरले. त्यामुळे तासंतास मेसीच्या एका दर्शनासाठी थांबलेल्या लोकांना त्याची एक झलक मिळणेही दुर्मिळ झाले. परिणामी स्टेडियममध्ये गोंधळ झाला.

# आयुष म्हात्रेने पाक कर्णधारासोबत हस्तांदोलन करण्यास टाळले

**अंडर १९ आशिया ट्रॉफी**

**दुबई : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तानचे संघ पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर आमनेसामने आले. अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेत दोन्ही कट्टर प्रतिस्पर्धा संघांमध्ये रविवारी (दि. १४) दुबई येथे सामना खेळवला गेला. भारताच्या अंडर-१९ संघाचे नेतृत्व करणाऱ्या आयुष म्हात्रे सामन्यात पाकिस्तानच्या कर्णधाराशी हँडशेक केले नाही.

भारत आणि पाकिस्तान संघांमध्ये दुबईतील आयसीसी अकॅडमी ग्राऊंडवर गट टप्प्यातील सामना खेळवला गेला. या सामन्यात भारतीय संघाने नो हँडशेक पॉलिसी कायम ठेवली. पाकिस्तानचा कर्णधार फरहान युसूफने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, त्यानंतर दोन्ही कर्णधारांनी एकमेकांशी नजरदेखील मिळवली नाही. नंतर एकेक करून प्रेझेंटरला मुलाखती दिल्या आणि ड्रेसिंग रूममध्ये निघून गेले.

आशिया चषक २०२५दरम्यान भारतीय पुरुष संघाने सुरू केलेल्या नो-हँडशेक प्रोटोकॉलचे पालन सर्व आयसीसी स्पर्धांमध्ये केले जात आहे. त्यांनी स्पर्धेतील तिन्ही सामन्यांमध्ये पाकिस्तानशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला आणि त्यांनी आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वी, जे पाकिस्तानचे गृहमंत्रीदेखील आहेत, यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. आयसीसी महिला विश्वचषकादरम्यानही भारतीय महिला संघाने पाकिस्तानच्या संघाशी हस्तांदोलन केले नव्हते.


# अखेरच्या लढतीत जॉन सीनाचा पराभव

## रिंगला किस करून घेतला डब्ल्यूडब्ल्यूईचा निरोप

**वॉशिंग्टन : वृत्तसंस्था**

डब्ल्यूडब्ल्यूई रिंगणातील महान सुपरस्टार आणि १७ वेळा वर्ल्ड चॅम्पियन ठरलेल्या जॉन सीना याच्या २३ वर्षांच्या शानदार कारकीर्दीचा अखेर 'शनिवार नाईट्स मेन इव्हेंट'मध्ये अत्यंत भावनात्मक आणि धक्कादायक पद्धतीने समारोप झाला. आपल्या अंतिम सामन्यात सीना याला रिंग जनरल गुंथरकडून पराभव पत्करावा लागला.

सामना वॉशिंग्टन डी.सी. येथील कॅपिटल वन अरेनामध्ये खेळला गेला. मॅचच्या निर्णायक क्षणी गुंथरने सीना याला 'स्लीपर होल्ड'मध्ये पकडले आणि त्यांना 'टॅप आऊट' (पराभव मान्य करणे) करावे लागले. गेल्या जवळपास २० वर्षांच्या कारकीर्दीत सीना यांनी 'टॅप आऊट' होण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे अरेनामधील चाहते काही क्षण स्तब्ध झाले आणि अनेकांनी



डब्ल्यूडब्ल्यूईच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त केली.

सीएम पंक आणि कोडी ऱ्होड्स यांनी त्याला चॅम्पियनशिप बेल्ट्स देऊन सन्मानित केले. भावनाविवश झालेल्या सीनाने आपले बूट आणि रिस्टबँड्स रिंगच्या मध्यभागी ठेवून डब्ल्यूडब्ल्यूई विश्वाला अखेरचा 'सॅल्यूट' केला आणि रिंगमधून बाहेर पडला.

# २०२५ ठरले निवृत्तीचे वर्ष! दिग्गजांचा क्रिकेटला अलविदा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यंदाचं वर्ष हे खऱ्या अर्थाने निवृत्त्यांचे वर्ष ठरले. भारतासह अनेक देशातल्या खेळाडूंनी विविध प्रकारातून निवृत्ती घेतली. कोणी टेस्ट खेळणे सोडले, कोणी वनडे, तर कोणी आंतरराष्ट्रीय क्रिकेटलाच. रोहित शर्मा आणि विराट कोहली या आधुनिक काळातल्या अग्रगण्य शिलेदारांनी कसोटी क्रिकेटला राम राम करत चाहत्यांना धक्का दिला.



हिटमॅन रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेत चाहत्यांना धक्का दिला. काही महिन्यांपूर्वी लौकिकाला साजेशी कामगिरी नसल्याने रोहितने कसोटीतून स्वत:ला अंतिम अकरातून बाहेर केले होते. ६७ कसोटी सामन्यात रोहितने भारताचे प्रतिनिधित्व करत ४३०१ धावा केल्या आहेत.

विराट कोहलीची कसोटी निवृत्ती हा यंदाच्या वर्षातला सगळ्यात चर्चित क्षणांपैकी एक आहे. १२ मे २०१५ रोजी त्याने कसोटी प्रकारातून निवृत्त होत असल्याचे इन्स्टाग्रामच्या माध्यमातून जाहीर केले. १२३ कसोटीत ९२३० धावा विराटच्या नावावर आहेत.

ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार स्टीव्हन स्मिथने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताविरुद्धच्या पराभवानंतर वनडे क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. १५ वर्षांच्या प्रदीर्घ वनडे कारकिर्दीत स्मिथने ४३.२८च्या सरासरीने ५८०० धावा केल्यात.

मिचेल स्टार्कने टी-२० प्रकारातून निवृत्त होत असल्याचे घोषित केले. टेस्ट आणि वनडेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्टार्कने हा निर्णय घेतला.

स्टार्कचा ऑस्ट्रेलिया संघातील सहकारी मार्कस स्टॉइनसने ६ फेब्रुवारी २०२५ रोजी वनडे क्रिकेटला अलविदा केला. अष्टपैलू म्हणून छाप उमटवणाऱ्या स्टॉइनची उणीव 'कांगारू'ना भासणार आहे.

राहुल द्रविडचा वारसा समर्थपणे सांभाळणाऱ्या चेतेश्वर पुजाराने यंदाच्या वर्षीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केला. पुजाराने अभेद्य तंत्रकौशल्याचा वस्तुपाठ सादर करत १०३ कसोटीत ७१९५ धावा केल्या. २०२१-११ ऑस्ट्रेलिया दौऱ्यात भारतीय संघाने ऐतिहासिक मालिका विजय साकारला. त्या विजयाचा पुजारा शिल्पकार होता.

श्रीलंकेचा माजी कर्णधार आणि अष्टपैलू खेळाडू अँजेलो मॅथ्यूजने कसोटी क्रिकेट सोडण्याचा निर्णय घेतला. धडाकेबाज फलंदाजीसाठी प्रसिद्ध, चपळ क्षेत्ररक्षक, उपयुक्त फिरकीपटू अशा अष्टपैलू ग्लेन मॅक्सवेलने वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. वादळी फटकेबाजीसाठी प्रसिद्ध रसेल वेस्ट इंडिजपेक्षा जगभरातील टी-२० लीगमध्ये जास्त दिसतो. रसेलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.

श्रीलंकेचा माजी कर्णधार आणि भरवशाचा सलामीवीर दिमुथ करुणारत्नेने यंदा क्रिकेटला अलविदा केला. दक्षिण आफ्रिकेचा धडाकेबाज विकेटकीपर फलंदाज हेनरिच क्लासनने टेस्ट, वनडे आणि टी-२० अशा तिन्ही प्रकारातून निवृत्ती घेत सगळ्यांनाच धक्का दिला. पल्लेदार षटकारांसाठी प्रसिद्ध असा वेस्ट इंडिजचा फलंदाज पूरनने टी-२० लीगमध्ये खेळण्याला प्राधान्य देत वेस्ट इंडिजसाठी खेळणे सोडले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com